# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

**सिडको भवन, २रा मजला (दक्षिण कक्ष), बेलापूर, नवी मुंबई -४००६१४**

**दूरध्वनी : ०२२-२२०२६५४९, २२८३५२४७,२२०२५३५४**

ई-मेल : ms.mjp२०२२@gmail.com, mjpcao@gmail.com


जा.क्र.मजीप्रा-२०२५/प्र.क्र.१/बैठक-१५९/आ-४, दिनांक :- 20 एप्रिल, २०२६

**प्रति,**

मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाच्या उपाध्यक्षा, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाच्या उपाध्यक्षा, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (न.वि.२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (व्यय) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

विषय :- दिनांक ११ मार्च, २०२६ रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५९व्या बैठकीचे इतिवृत्त.

संदर्भ :- १. प्राधिकरणाचे समक्रमांकित पत्र दिनांक ०२.०३.२०२६
२. प्राधिकरणाचे समक्रमांकित पत्र दिनांक ०६.०३.२०२६
३. प्राधिकरणाचे समक्रमांकित पत्र दिनांक ०९.०३.२०२६

महोदय/महोदया,

दिनांक ११ मार्च, २०२६ रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५९व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

मान्यतेने.

आपला विश्वासू,

(गजानन गुरव)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

सोबत :- इतिवृत्ताची प्रत

**प्रत :** मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई, यांचे माहितीसाठी.

सोबतचे इतिवृत्त मा.मंत्री, पा.पु. स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.

...२/-

प्रत: माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई.
- उप सचिव (पापु-२३), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर.
- अधीक्षक अभियंता (मुख्यालय), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, म.नि.सं. व सं.कक्ष, मित्तल चेंबर्स, मुंबई.
- उप मुख्य लेखा अधिकारी (१/२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई.
- उप अभियंता (आय.टी.सेल), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.
- उप अभियंता (आ-९), स्थावर मालमत्ता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सिडको भवन, नवी मुंबई.
- कायदा व कामगार अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सिडको भवन, नवी मुंबई.
- कार्यासन अधिकारी (आस्था-३), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सिडको भवन, नवी मुंबई.

सोबतचे इतिवृत्तातील आपल्या कार्यालयाशी संबंधीत कार्यक्रम बाबींवर योग्य ती कार्यवाही त्वरित करुन केलेल्या कार्यवाहीचा कार्यपुर्ती अहवाल २ आठवडयामध्ये सादर करावा.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५९ व्या बैठकीचे इतिवृत्त.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १५९ वी बैठक मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री.गुलाबराव पाटील यांचे अध्यक्षतेखाली ७ वा मजला, मुख्य इमारत समिती कक्ष क्र.५ मंत्रालय, मुंबई येथे बुधवार दिनांक ११ मार्च, २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता संपन्न झाली. या बैठकीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा.श्री.गुलाबराव पाटील, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे संचालक मंडळाचे पदसिध्द अध्यक्ष.
२. मा.श्रीमती मेघना साकोरे- बोर्डीकर, राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा तथा प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या पदसिध्द उपाध्यक्षा.
३. श्री.पराग जैन- नैनुटिया, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई तथा प्राधिकरणाच्या संचालक मंडळाचे सदस्य
४. श्री.अमगोथू श्री रंगा नायक, सदस्य सचिव म.जी.प्रा.मुंबई तथा प्राधिकरणाच्या संचालक मंडळाचे सदस्य सचिव

**या व्यतिरिक्त सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.**

१. श्रीमती के.एस.पोतदार, उप सचिव, ग्राम विकास विभाग मंत्रालय, मुंबई
२. श्री.विलास बेद्रे, उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई.
३. श्रीमती राजश्री ठोकळ, संचालक (वित्त) प्रभारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
४. श्री.गजानन गुरव, मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
५. श्रीमती मनिषा पलांडे, मुख्य अभियंता (स्थापत्य), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, छत्रपती संभाजीनगर (व्हीसीद्वारे)
६. श्री.प्रशांत भामरे, मुख्य अभियंता (स्थापत्य) प्रभारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, ठाणे (व्हीसीद्वारे)
७. श्री.अजय सिंह, अधीक्षक अभियंता (मुख्यालय), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
८. श्रीमती सुनिता प.साळूंके, अवर सचिव, वित्त विभाग (व्यय) मंत्रालय, मुंबई.
४. श्री.विजय चव्हाण, वरिष्ठ लेखा अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
५. श्रीमती वर्षा साळूंखे, वरिष्ठ लेखा अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
६. श्री.मिलिंद काबाडी, सहाय्यक लेखा अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.

सर्वप्रथम सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, यांच्या परवानगीने बैठकीस सुरुवात करण्यात आली.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. १:-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या च्या १५८ व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळाची १५८ वी बैठक दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव मा.संचालक मंडळास सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी मा.संचालक मंडळास केली.

**ठराव :-**

इतिवृत्तावर चर्चा होऊन, १५८ व्या बैठकीच्या इतिवृत्तास मा.संचालक मंडळाने मान्यता दिली.

**कार्यक्रम बाब क्र. २:-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १५८ व्या बैठकीमध्ये मंजूर कार्यक्रम बाबींवरील निर्णयावर करण्यात आलेल्या कृतीस मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळाच्या दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी संपन्न झालेल्या १५८ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले, त्या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले.

**ठराव :-**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १५८ व्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयाबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या/अहस्तांतरीत नागरी, ग्रामीण पाणी पुरवठा योजना, डोंगराळ/पर्यटन क्षेत्रातील पाणी पुरवठा योजना व पेरी अर्बन योजनामधून होणाऱ्या पाणी पुरवठयाचे सुधारीत दर लागू करणेबाबत.

१. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ च्या कलम २७ मधील तरतुदीनुसार प्राधिकरणाने आपला कारभार शक्यतो विना तोटा चालवावयाचा आहे. तसेच या तरतुदीच्या पूर्ततेसाठी अधिनियमातील कलम ३५ नुसार पाणी दराबाबत वेळोवेळी आढावा घेऊन दर सुधारीत करण्याचे अधिकार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला दिलेले आहेत.

२. सद्यःस्थितीत प्राधिकरणाकडे २२ नागरी व २० ग्रामीण असे एकुण ४२ पाणी पुरवठा योजना अहस्तांतरीत असल्याने म.जी.प्रा. मार्फत चालविण्यात येत आहेत.

३. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविण्यात येत असलेल्या प्रत्येक नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा केंद्राचे बाबतीत, पाणी पुरवठयाचे दर सुधारित करण्यासाठी म.जी.प्रा.च्या दि.१६.०७.२०१३ रोजी झालेल्या १२९ व्या मा.संचालक मंडळाच्या बैठकीत कार्यक्रम बाब क्र. १३ नुसार, प्रचलीत पाणीपट्टी दरात १०% इतकी वाढ करण्याचे निर्देशीत केले आहेत.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

४. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या नागरी/ग्रामीण पा.पु. योजनांचे पाणीदर लागू करण्याची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र दिनांक १५ जुन २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच नागपूर पेरी अर्बन योजनेचे पाणीदर लागू करण्याची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र दिनांक १४ मार्च २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच अंबरनाथ-बदलापूर पाणीपुरवठा केंद्रामधील किरकोळ ग्राहकांसाठी पाणीदर महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र दिनांक १७ जुन २०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या अधिसूचनानुसार कायम ठेवले आहेत.

५. पाणी पुरवठा दरवाढ करण्याची आवश्यकता खालील प्रमाणे आहे :-

i) दरवाढीची परिगणना ग्राहकांना देण्यात येणाऱ्या देयकाच्या रक्कमेवर (Assessment) आधारित आहे. मात्र प्रत्यक्षात सदर रक्कम पूर्ण वसुल होत नाही.

ii) ई.टी.पी.चे दर कमी होणे.

iii) आस्थापना विषयक बाबी, महागाई भत्यात वाढ, विज देयके, अशुध्द पाण्याच्या देयकात व पा.पु.केंद्रे/योजना जुन्या असल्यामुळे जास्तीच्या हिशोब बाहय पाण्याचे प्रमाण व त्यामुळे जास्तीच्या दुरुस्तीचा खर्च.

iv) पाणी पुरवठा केंद्र / योजना जुन्या असल्यामुळे काही उपांगे बदलणे किंवा त्यांना विशेष दुरुस्ती आवश्यक आहे.

v) काही नळांच्या वाढीव योजना/सुधारीत योजना हाती घेणे आवश्यक असल्याने त्यांच्या कर्जाचा हप्ता भरणे अपेक्षित आहे.

६. एकूण २० ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची सध्या म.जी.प्रा. मार्फत देखभाल दुरुस्ती करण्यात आहे. काही ग्रामीण पाणी पुरवठा योजना कार्यक्रम बाबीद्वारे देखभाल दुरुस्तीसाठी ताब्यात घेण्यात आल्या आहेत व उर्वरित योजना हस्तांतरीत न झाल्याने नाईलाजाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास चालवाव्या लागत आहेत. आकारणी व खर्च पहाता वरील योजना तोटयात चालविल्या जात आहेत. त्याची सर्वसाधारण कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

i) पाणी दर आकारणी व वसुली यातील तफावत

ii) समाविष्ट गावांसाठी कालांतराने स्वतंत्र योजना झाल्याने या योजनेतून लाभ न घेणे, मात्र यासाठी स्थिर खर्च वाढणे

iii) योजनेसाठी पाणी दूर अंतरावरून आणावे लागणे व वस्ती स्त्रोतापासून उंचावर वसलेली असणे.

iv) भौगोलिक रचना लक्षात घेता आस्थापना खर्च वाढणे

v) विजेचा वाढीव खर्च

vi) योजनेच्या स्थापित क्षमतेचा पूर्णपणे वापर न होणे.

vii) योजनेव्दारे प्राप्त होणा-या महसुलापेक्षा योजनेवर होणारा खर्च अधिक आहे.

महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी यांच्याकडुन होणारी दरवाढ, पाटबंधारे विभागाकडुन होणारी दरवाढ तसेच कर्मचारी अधिकारी व निवृत्ती वेतन धारक यांच्या वेतन व भत्ते पोटी होणारी वाढ विचारात घेता मा.संचालक मंडळाच्या बैठकीत पाण्याच्या दरात पाणीपुरवठा केंद्राच्या सध्याच्या प्रचलित पाणीदरात १० % दरवाढ करणे प्रस्तावित आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**ठराव :-**

१. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या २२ नागरी व २० ग्रामीण असे एकुण ४२ पाणी पुरवठा योजना मालकीच्या/अहस्तांतरीत असल्याने म.जी.प्रा. मार्फत चालविण्यात येत आहेत. सदर योजनांच्या सद्याच्या प्रचलित पाणीदरात आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी १० % दरवाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच याबाबतची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

२. मात्र यापुढे पाणीदर वाढ करण्याकरीता WPI/CPI निर्देशांकानुसार ठरविण्यासाठी सदस्य सचिव यांनी समिती तयार करण्याचा ठराव करण्यात येत आहे. सदर समितीचा अहवाल पुढील बैठकीत सादर करण्याची कार्यवाही सदस्य सचिव यांनी करावी.

**कार्यक्रम बाब क्र.४ :-** केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० कार्यक्रमांतर्गत अंबरनाथ नगरपरिषद नळ पाणी पुरवठा योजना ता.अंबरनाथ जि.ठाणे - योजनेवर होणारा अपेक्षित वाढीव खर्च म.जी.प्रा.च्या घसारा निधीतून मिळण्याबाबत.

केंद्र शासन पुरस्कृत अमृत-२.० कार्यक्रमांतर्गत अंबरनाथ नगरपरिषद नळ पाणी पुरवठा योजना ता.अंबरनाथ जि.ठाणे या योजनेची किंमत रु.२१५.६७ कोटी (निव्वळ) व रु.२५८.२८ कोटी (ढोबळ) असून, सदर योजनेस नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्र.अमृत-२०२४/ प्र.क्र.२३२/ नवि-३३ दि.१०/०७/२०२४ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर योजनेचा वित्तीय आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

| वित्तीय आकृतीबंध | केंद्र शासन अनुदान | राज्य शासन अनुदान | मजीप्रा हिस्सा | एकुण |
|---|---|---|---|---|
| | ३३.३३%<br>रु.८६.०८ कोटी | ५१.६७%<br>रु.१३३.४६ कोटी | १५%<br>रु.३८.७४ कोटी | रु.२५८.२८ कोटी |

सदर योजना ही मजीप्राची योजना असल्याने योजनेच्या प्रशासकीय मान्यतेनुसार सदर प्रकल्पासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा मजीप्रामार्फत उभारावयाचा आहे. त्यानुसार मजीप्राच्या मा.संचालक मंडळाच्या दि.२३.०७.२०२४ रोजी झालेल्या १५६ व्या बैठकीत मजीप्राचा हिस्सा रु.३८.७४ कोटी म.जी.प्रा.च्या घसारा निधीमधून परत करण्याच्या अटीच्या अधीन राहून उभारण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर कामाची रु.१९०.०९ कोटी किंमतीची निविदा मजीप्रामार्फत प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर निविदेकरिता न्युनतम देकार भरलेले ठेकेदार मे. इंदरदिप कंन्स्ट्रक्शन कंपनी अँड मेईगल इंन्फ्रा . .इंडिया लि(जे.व्ही.) उल्हासनगर यांनी निविदा किंमतीवर १३.५०% जादा दराचा देकार सादर केला होता. त्यानुसार सदर निविदा मजीप्राच्या दि.११.१०.२०२४ रोजी झालेल्या १७१ व्या बैठकीत निर्णयार्थ सादर करण्यात आली होती. सदर बैठकीत ठेकेदार निविदा मुल्यांकित किंमतीवर १०% पर्यंत देकार कमी करण्यास तयार झाल्यास निविदा सदस्य सचिव, मजीप्रा यांच्या स्तरावर स्वीकृत करण्यात यावी. अन्यथा फेरनिविदा करण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला. यानुसार सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांच्या स्तरावर

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

ठेकेदारासोबत वाटाघाटी करण्यात आल्या असून ठेकेदाराने त्यांच्या दि.११.१०.२०२४ च्या पत्रान्वये ९.५०% जादा दराचा सुधारित देकार सादर केला आहे. यानुसार देकाराची किंमत रु. २०८.१५ कोटी इतकी आहे.

ठेकेदाराचा सुधारित देकार, निविदेत अंतर्भुत न केलेल्या बाबी, जीएसटी, भाववाढ इ. गृहीत धरून योजनेवर रु.२७७.८१ कोटी इतका ढोबळ खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे योजनेवर रु.१९.५३ कोटी इतका वाढीव खर्च अपेक्षित आहे. योजनेच्या प्रशासकीय मान्यतेच्या शासन निर्णयानुसार राज्य शासनामार्फत नागरी स्वराज्य संस्थेसाठी प्रकल्प मंजूर झाल्यानंतर मूळ प्रकल्प किंमतीमध्ये पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दि.२९.०६.२०२२ रोजीच्या शासन निर्णयामधील नमूद कारणाव्यतिरिक्त वाढ झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कार्यान्वयन यंत्रणेची राहील. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दि.२९.०६.२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार भावभिन्नता कलमाचा समावेश नगर विकास विभागामार्फत हाती घेण्यात येणाऱ्या अमृत व नगरोत्थान योजनांसाठी लागु राहणार आहे. मुख्य अभियंता यांनी योजनेच्या एकूण खर्चामध्ये रु.५.७५कोटी इतकी भावभिन्नता तरतुद गृहीत धरली आहे. उपरोक्त शासन निर्णयानुसार सदर भावभिन्नता तरतूद शासनामार्फत देय असल्याने सदर रक्कम वगळता उर्वरित वाढीव रक्कम रु.१३.७८ कोटी मजीप्राच्या घसारा निधीमधून उभारणे आवश्यक आहे. तथापि, मुख्य अभियंता यांनी योजनेवर होणारा एकूण वाढीव खर्च रु.१९.५३ कोटी (भावभिन्नतेच्या तरतुदीसह) मजीप्राच्या घसारा निधितुन उभारणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

म.जी.प्रा.च्या मा. संचालक मंडळाच्या दि.११.१०.२०२४ रोजी झालेल्या १५८ व्या बैठकीत सदर कामावर होणारा वाढीव खर्च रु.१३.७८ कोटी मजीप्राच्या घसारा निधीतुन परत करण्याच्या अटीच्या अधिन राहून उभारण्यास मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव कार्यक्रम बाबीद्वारे सादर करण्यात आला होता. तथापि, सदर बैठकीमध्ये सदरील कार्यक्रम बाब पुढे ढकलण्यात (Deferred) आली.

सदर योजनेमध्ये प्रस्तावित जलशुध्दीकरण केंद्र, अशुध्द पाण्याची उर्ध्ववाहिनी व शुध्द पाण्याची गुरुत्ववाहिनी तसेच तीन जलकुंभाकरीता वन विभागाकडून जागा संपादन करावी लागणार आहे. या बाबत प्रस्ताव वन विभागाकडे सादर करण्यात आलेला असून, दि.०१.०८.२०२४ व दि.१४.१०.२०२४ रोजी मा.प्रधान सचिव, नगरविकास-२ यांचे अध्यक्षतेखालील झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार वन विभागाकडून जागा हस्तांतरीत झाल्यानंतरच कामाचे कार्यादेश देण्यात यावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत.

सदर कामाच्या निविदेचे कार्यादेश देण्याच्या अनुषंगाने नगर विकास विभागाच्या केंद्र शासन पुरुस्कृत अमृत-२.० अभियानांतर्गत गठित राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या दि.०१.०८.२०२४ व दि.१४.१०.२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशामधील सदर प्रकल्पातील उपांगांच्या जागा नगर परिषदेच्या नावावर व ताब्यात असल्याची खातरजमा करुन कार्यादेश देण्याबाबतची अट शिथिल करुन कार्यादेश देण्यास परवानगी मिळणेबाबत नगरविकास विभागास मजीप्रा, मध्यवर्ती कार्यालयाचे पत्र क्र. तांशा-३/१२६८, दि.३०.१२.२०२४ अन्वये विनंती करण्यात आली होती.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

मा. प्रधान सचिव, (नवि-२) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्र पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत गठित राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या दि.१५.०१.२०२५ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त कक्ष अधिकारी नवि-३३, यांचे पत्र क्र. अमृत-२०२५/ प्र.क्र.०७/ नवि-३३, दि.२३.०१.२०२५ अन्वये निर्गमित करण्यात आले आहे. सदर इतिवृत्तान्वये मुख्य अभियंता, मजीप्रा, ठाणे यांच्या विनंतीनुसार प्रकल्पाकरीता आवश्यक असलेल्या १४ जागांपैकी १० जागा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व अंबरनाथ नगरपरिषद यांच्या त्याब्यात असून उर्वरित ४ जागांकरीता वन विभागाकडे पाठपुरावा सुरु असल्याचे व कार्यादेश निर्गमित केल्यास उद्भव व इतर कामे शक्य असल्याचे विचारात घेता प्रकल्पातील उपांगाच्या जागा नगर परिषदेच्या नावावर व ताब्यात असल्याची खातरजमा करुनच कार्यादेश निर्गमित करण्याची अट शिथिल करण्याची समितीने शिफारस केली. तथापि, प्रकल्पातील जागा ताब्यात नसल्यामुळे अथवा अन्य कोणत्याही कारणामुळे प्रकल्पाची किंमत वाढल्यास वाढीव किंमतीचा बोजा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने उचलावा लागेल व त्यासंबंधी ठराव करुन कार्यादेश द्यावा असे समितीने सूचित केले आहे.

सदर योजनेवर होणारा वाढीव खर्च रु.१३.७८ कोटी (भावभिन्नता तरतूद वगळून) तसेच प्रकल्पातील जागा ताब्यात नसल्यामुळे (जल शुद्धीकरण केंद्राची प्रस्तावित जागा वन विभागाकडून संपादन करण्यास विलंब झाल्यास) अथवा अन्य कोणत्याही कारणामुळे प्रकल्पाची किंमत वाढल्यास वाढीव खर्च मजीप्राच्या घसारा निधीमधून परत करण्याच्या अटीच्या अधीन राहून उपलब्ध करण्यास मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव कार्यक्रम बाबीद्वारे मजीप्राच्या मा. संचालक मंडळाच्या बैठकीत सादर करुन त्यास मा.संचालक मंडळाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर कामाच्या निविदेचे कार्यादेश देणे प्रस्तावित होते. तथापि, नगर विकास विभाग तसेच केंद्र शासनाकडून सदर कामाच्या निविदेचे कार्यादेश देऊन कामे सुरु करण्याबाबत सातत्याने पाठपुरावा होत असल्याने उपरोक्त नुसार योजनेवर होणारा वाढीव खर्च मजीप्राच्या घसारा निधीतुन परत करण्याच्या अटीच्या अधीन राहून उभारण्यास मा.संचालक मंडळाची मान्यता प्राप्त करुन घेण्याच्या अटीवर सदर कामाच्या निविदेचे कार्यादेश देण्यास मजीप्रा मध्यवर्ती कार्यालयाच्या दि.०४.०३.२०२५ रोजीच्या टिप्पणीन्वये मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांना विनंती करण्यात आली होती. त्यास मा. मंत्री, पाणी पुरवठ व स्वच्छता यांनी मान्यता दिलेली आहे. सदर मान्यतेनुसार सदर कामाच्या निविदेचे दि.१७.०३.२०२५ रोजी कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

वरीलप्रमाणे चर्चा होऊन सदर योजनेवर होणारा वाढीव खर्च रु.१३.७८ कोटी (भावभिन्नता तरतूद वगळून) तसेच प्रकल्पातील जागा ताब्यात नसल्यामुळे (जल शुद्धीकरण केंद्राची प्रस्तावित जागा वन विभागाकडून संपादन करण्यास विलंब झाल्यास) अथवा अन्य कोणत्याही कारणामुळे प्रकल्पाची किंमत वाढल्यास वाढीव खर्च मजीप्राच्या घसारा निधीमधून परत करण्याच्या अटीच्या अधीन राहून उपलब्ध करण्यास खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की,

केंद्र शासन पुरस्कृत अमृत-२.० अभियान अंतर्गत मंजूर अंबरनाथ नगर परिषद नळ पाणी पुरवठा योजनेच्या प्रशासकीय मान्यतेनुसार त्याचप्रमाणे मा.प्रधान सचिव (नवि-२) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्र पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत गठित राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या दि.१५.०१.२०२५ रोजी झालेल्या बैठकीच्या

| | |
|---|---|
| अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्वच्छता | सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा. |

इतिवृत्तानुसार सदर योजनेवर होणारा वाढीव खर्च मजीप्राच्या घसारा निधीतुन उभारण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर कामाच्या निविदा स्विकृतीमुळे योजनेवर होणारा वाढीव खर्च रु.१३.७८ कोटी (भावभिन्नतेची तरतुद वगळून) तसेच प्रकल्पातील जागा ताब्यात नसल्यामुळे (जल शुद्धीकरण केंद्राची प्रस्तावित जागा वन विभागाकडून संपादन करण्यास विलंब झाल्यास) अथवा अन्य कोणत्याही कारणामुळे प्रकल्पाची किंमत वाढल्यास होणारा वाढीव खर्च म.जी.प्रा.च्या घसारा निधीतून परत करण्याच्या अटीच्या अधीन राहून उभारण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर निधी घसारा निधीमध्ये परत करण्याची संपूर्ण जबाबदारी मुख्य अभियंता, ठाणे व कार्यकारी अभियंता, अंबरनाथ यांची राहील.

२. उपरोक्त मुद्दा क्र.१ मध्ये नमूद केल्यानुसार वाढीव खर्च मजीप्राच्या घसारा निधीतुन परत करण्याच्या अटीच्या अधिन राहून उभारण्यास मा.संचालक मंडळाची मान्यता प्राप्त करुन घेण्याच्या अटीवर सदर कामाच्या निविदेचे कार्यादेश देण्यास अध्यक्ष तथा मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांनी दिनांक ०४.०३.२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर कामाच्या निविदेचे कार्यादेश दि.१७.०३.२०२५ रोजी देण्यात आलेले आहेत. करण्यात आलेल्या सदर कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

३. उपरोक्त नुसार घसारा निधीतुन उपलब्ध करावयाची रक्कम व सदर रक्कम परत करावयाचा कालावधी या नुसार पाणी दरात आवश्यक वाढ करण्याकरिता सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. योजनेच्या प्रशासकीय मान्यतेच्या शासन निर्णयानुसार राज्य शासनामार्फत नागरी स्वराज्य संस्थेसाठी प्रकल्प मंजूर झाल्यानंतर मूळ प्रकल्प किंमतीमध्ये पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दि.२९.०६.२०२२ रोजीच्या शासन निर्णयामधील नमूद कारणाव्यतिरिक्त वाढ झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कार्यान्वयन यंत्रणेची राहणार आहे. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दि.२९.०६.२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार भावभिन्नता कलमाचा समावेश नगर विकास विभागामार्फत हाती घेण्यात येणाऱ्या अमृत व नगरोत्थान योजनांसाठी लागु राहणार आहे. त्यानुसार मुख्य अभियंता यांनी योजनेच्या एकूण खर्चामध्ये रु.५.७५ कोटी इतकी भावभिन्नता तरतुद गृहीत धरली आहे. उपरोक्त शासन निर्णयानुसार सदर भावभिन्नता तरतूद शासनाकडून मिळण्याबाबतचा प्रस्ताव मुख्य अभियंता यांनी शासनास सादर करुन सदर खर्च शासनाकडून प्राप्त करुन घ्यावा. याबाबतची संपुर्ण जबाबदारी मुख्य अभियंता व कार्यकारी अभियंता यांची राहणार आहे.

या बाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.५ :-** म.जी.प्रा.च्या मालकीच्या अंबरनाथ शहराकरीता सन २०५६ सालाकरिता उल्हास नदी उद्भवावर आधारित पाणी पुरवठा योजना राबविणेकरीता वन विभागाची ४.३८ हेक्टर जागा अधिग्रहीत करणे व म.जी.प्रा.कडील उपलब्ध विनावापर ४.३८ हेक्टर जागा वनविभागाकडे हस्तांतरीत करणे.

**प्रस्तावना :-**

अंबरनाथ शहराच्या वेगाने वाढ होत असलेल्या लोकसंख्येस भविष्यातील पाणी मागणी गृहीत धरून केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान टप्पा-२ अंतर्गत शासन निर्णय क्रमांक अमृत-२०२४/प्र.क्र.२६२/नवि-३३ दि.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

१०/०७/ २०२४ अन्वये अंबरनाथ नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. या योजनेमध्ये मजीप्राचा १५% हिस्सा समाविष्ट आहे. या हिस्यापोटी ३८.७४ कोटी किंमतीच्या प्रस्तावास मा.संचालक मंडळाच्या १५६ व्या बैठकीत मान्यता प्रदान केली आहे.

योजनेची संक्षिप्त माहिती पुढील प्रमाणे आहे.

**अंबरनाथ पाणी पुरवठा योजना:**

| | | |
|---|---|---|
| १. लोकसंख्या | सन २०२६ | ३८२१९९ |
| | सन २०४१ | ५३७३४८ |
| | सन २०५६ | ७२८१४३ |
| २. पाणी पुरवठ्याचे प्रमाण | | १३५ LPCD |
| ३. दैनंदिन पाण्याची मागणी | सन २०२६ | ८१.३८द.ल.ली.(आयुध निर्माणी कारखाना ८.०० द.ल.ली.) |
| | सन २०४१ | १११.०४द.ल.ली.(आयुध निर्माणी कारखाना८.०० द.ल.ली.) |
| | सन २०५६ | १४७.४९द.ल.ली.(आयुध निर्माणी कारखाना ८.००द.ल.ली. |
| ४. पंपाचे तास | | २० |
| ५. योजनेची किंमत | | रु. २१५.६८ कोटी (निव्वळ) |
| | | रु. २५८.२९ कोटी (ढोबळ) |

सदर प्रस्तावित योजनेतील टप्पा-२ करीता वर्ष २०४१ ची पाण्याची मागणी १११.०४ द.ल.ली. प्रतिदिन असून वर्ष २०५६ करीता पाण्याची मागणी १४७.४९ द.ल.ली. प्रतिदिन इतकी आहे. योजने अंतर्गत अंबरनाथ शहराच्या सन २०५६ सालच्या लोकसंखेस लागणाऱ्या पाणी मागणीचा विचार करून तसेच अंबरनाथ व बदलापूर शहरातील अस्तित्वातील पाणी पुरवठा योजना एकत्रित असल्याने उद्भवनाऱ्या समस्या लक्षात घेवून कल्याण मुरबाड हायवे शेजारील गोवेली गावाजवळ उल्हास नदीवर शिर्ष कामे तसेच जॅकवेल ते जलशुध्दीकरण केंद्र पर्यंत उर्ध्ववाहीनी व पंपींग मशिनरी, नालिंबी येथील उंच टेकडीवर जलशुध्दीकरण केंद्र व मुख्य संतुलन टाकी तसेच मुख्य संतुलन टाकी येथून अंबरनाथ शहरातील संपुर्ण जलकुंभ गुरुत्व पध्दतीने भरणे प्रस्तावित आहे. त्यामुळे अंबरनाथ शहरातील अस्तित्वातील ३ उदंचन केंद्र येथून होणारे पंपींग वाचणार आहे. तसेच शहरात नवीन १० जलकुंभ व १४९ कि.मी. (DI, HDPE) वितरण वाहीन्या व तद्नुषंगीक कामे प्रस्तावित केलेली आहेत. सदर योजनेची किंमत रु. २१५.६८ कोटी (निव्वळ) व रु.२५८.२८ कोटी (ढोबळ) असून, योजनेचा वित्तीय आकृती बंध खालील प्रमाणे आहे.

(रू. कोटी)

| | केंद्र शासन अनुदान | राज्य शासन अनुदान | मजीप्रा हिस्सा | एकुण |
|---|---|---|---|---|
| वित्तीय आकृतीबंध | ३३.३३ % | ५१.६७ % | १५% | |
| | ८६.०८ | १३३.४६ | ३८.७४ | २५८.२८ |

**प्रस्ताव :**

प्रस्तावित अंबरनाथ पाणी पुरवठा योजनेमध्ये जॅकवेल, जलशुध्दीरण केंद्र व उंच जलकुंभाचे कामाकरीता एकूण १४ जागा आवश्यक असून, १२ जलकुंभांपैकी २ जागा म.जी.प्रा.च्या ताब्यात आहेत.७ जागा अंबरनाथ नगरपरिषदेकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. ३ जागा वनविभागाच्या जागेवर बांधणे प्रस्तावित आहे. तसेच अशुध्द पाण्याची उर्ध्ववाहीनी, जलशुध्दीकरण केंद्र व शुध्द पाण्याची गुरुत्ववाहीनी वनविभागाच्या जागेवर प्रस्तावित आहे. अशा प्रकारे संपूर्ण प्रकल्पांतर्गत अशुध्द पाण्याची उर्ध्ववाहीनी, जलशुध्दीकरण केंद्र, शुध्द

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

पाण्याची गरुत्ववाहीनी व ३ जलकुंभाकरीता वनविभागाची जमिन अधिग्रहीत करण्याकरीता वन विभागाची परवानगी मागण्यात आली आहे. आवश्यक जागेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | उपांगाचे नाव | आवश्यक जागा (हेक्टर मध्ये) | जागेचा सर्व्हे नंबर |
|---|---|---|---|
| १ | जलशुध्दीकरण केंद्र -९६.०० द ल.ली. | ३.१६८ | १८६, कोहोज खुंटवली |
| २ | अशुध्द पाण्याची उर्ध्ववाहीनी | ०.४८३ | १८६, कोहोज खुंटवली १४ नालीबी |
| ३ | शुध्द पाण्याची गरुत्ववाहोनी | ०.४२९ | १८६, कोहोज खुंटवली |
| ४ | रॉटरी क्लब येथील उंच जलकुंभ | ०.१५३ | ५२,वडवली |
| ५ | मुरगन मंदीर, जावसई येथील उंच जलकुंभ | ०.०७४ | १२/अ, जावसई |
| ६ | योगेश्वरी विद्यालय,बुवापाडा येथील उंच जलकुंभ | ०.०७४ | १८६, कोहोज खुंटवली |
| | **एकूण आवश्यक जागा** | **४.३८ हेक्टर** | |

प्रकल्पाकरीता आवश्यक ४.३८ हेक्टर जमीन वनविभागाकडून उपलब्ध करणे करीता प्रस्ताव Online पध्दतीने FCA अंतर्गत सादर करण्यात आलेला आहे. FCA अंतर्गत प्रस्तावास मान्यता मिळाल्यास पर्यायी शासकीय मोकळी जागा अथवा मजीप्राची अंबरनाथ विभागांतर्गत असलेली विनावापर जागा वनविभागास हस्तांतरीत करावी लागणार आहे.

सद्यस्थितीत अंबरनाथ विभागांतर्गत, बॅरेज धरण केंद्राजवळ उल्हास नदीच्या बदलापूर गावाच्या हद्दीतील नदी किनारी असलेली म.जी.प्रा.च्या मालकीची सर्वे नं.८५ब मधील २.८६ हेक्टर व बॅरेज धरण केंद्र येथील सर्व्हे नं. ५३ब मधील ६.६५ हेक्टर अशी एकूण ९.५१ हेक्टर मोकळी जागा उपलब्ध आहे. दोन्ही जागा बऱ्याच कालावधी पासून विनावापर पडून असून, भविष्यातही या जागेचा वापर होणार नाही.

अंबरनाथ पाणी पुरवठा योजना (अमृत टप्पा-२) मर्यादित वेळेत कार्यान्वित करावयाची असल्याने वन विभागाकडून ४.३८ हेक्टर जागा अधिग्रहीत करुन त्याबदल्यात म.जी.प्रा. कडील विनावापर ४.३८ हेक्टर जागा वनविभागास उपलब्ध करून दिल्यास योजनेचे काम त्वरेने पूर्ण करणे शक्य होणार आहे. तसेच प्रस्तावित जलशुध्दीकरण केंद्रापासून संपूर्ण योजना गुरुत्वपध्दतीने संकल्पीत केली असल्याने या जागी जलशुध्दीकरण केंद्र बांधल्यास भविष्यात विज देयकापोटी म.जी.प्रा.ची मोठी बचत होणार आहे.

मा. सदस्य सचिव, मजीप्रा मुंबई यांनी निर्देशीत केल्या प्रमाणे वनविभागास जागा हस्तांतरणाकरीता अंबरनाथ तालुका परिसरात शासकीय जागा उपलब्ध असल्यास मा. जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार अंबरनाथ विभागीय कार्यालयाचे पत्र क्र.तांशा-२/ ३७६९ दि.०३/१०/२०२४ नुसार जिल्हाधिकारी कार्यालयास प्रस्ताव सादर करणेत आला आहे. सदर प्रकरणाची कार्यवाही त्यांचे मार्फत सुरु आहे. तथापी, जिल्हाधिकारी यांचेकडून जागा उपलब्ध असल्यास ती मिळण्याबाबत लागणारा वेळ अथवा जागा उपलब्ध नसल्याबाबत मिळणाऱ्या दाखल्याकरिता लागणारा वेळ यामुळे योजनेच्या कामास विलंब होऊन योजनेच्या किंमतीत वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मजीप्राची विनावापर जागा वन खात्यास हस्तांतरण करणे संयुक्तिक रहाणार आहे.

वन खात्याकडून योजनेच्या उपांगाकरीता अधिग्रहीत करण्यात येत असलेल्या जागेचा मालकी हक्क मजीप्राच्या नावे रहाणार नसल्याने मजीप्राची जमिन वन खात्यास हस्तांतरण करण्याकरीता संचालक मंडळाची

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

मान्यता घेणे व संचालक मंडळाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियमातील तरतुदीनुसार राज्य शासनाची परवानगी प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

या कार्यक्रम बाबीवर मा.संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली व पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की,

बदलापूर गावाच्या हद्दीतील उल्हास नदी किनारी बॅरेज धरण केंद्राजवळ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सर्वे नं.८५ब मध्ये २.८६ हेक्टर व सर्वे नं.५३ब मध्ये ६.६५ हेक्टर अशी एकूण ९.५१ हेक्टर मोकळी जागा आहे. अमृत टप्पा-२ अंतर्गत मंजूर अंबरनाथ पाणी पुरवठा योजनेच्या (ज्यामध्ये १५% म.जी.प्रा.चा हिस्सा आहे) प्रस्तावित अशुध्द पाण्याची उर्ध्ववाहिनी, जलशुध्दीकरण केंद्र, शुध्द पाण्याची गुरुत्ववाहिनी व ३ जलकुंभ या उपांगासाठी लागणारी एकूण ४.३८ हेक्टर जमिन वन खात्याकडून अधिग्रहीत करण्यात येणार आहे. वन खात्याकडून अधिग्रहीत करण्यात येणारी जमिन ही म.जी.प्रा.च्या मालकीची होत नसल्याने या बदल्यात बदलापूर गावाच्या हद्दीतील उल्हास नदी किनाजी बॅरेज धरण केंद्राजवळ म.जी.प्रा.च्या मालकीच्या सर्वे नं.८५ब मधील २.८६ हेक्टर व सर्वे नं.५३ब मधील ६.६५ हेक्टर पैकी १.५२ हेक्टर (२.८६ + १.५२) अशी एकूण ४.३८ हेक्टर जागा वन खात्यास हस्तांतरित करण्याबाबतच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियमातील प्रकरण – अकरा "नियम, विनियम व उपविधी" मधील कलम क्र.६६ पोट कलम (१) नुसार राज्य शासनाची पुर्व मान्यता घेणे, (२) (ड) नुसार मालमत्तेचे व्यवस्थापन आणि (२) (ई) नुसार मालमत्तेसंबंधी करार करणे व तिचे हस्तांतरण करणे व आदेश व लेख अधिप्रमाणित करणे आवश्यक आहे.

उपरोक्त उपनियमानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची हस्तांतरीत करण्यात येणारी जागा वन खात्यास हस्तांतरण करण्यापुर्वी मान्य राहील या अटीवर संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात येत आहे. याबाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.६ :-** म.जी.प्रा.च्या मालकीची नागरी पाणी पुरवठा केंद्र तसेच अमृत व नगरोत्थान महाअभियानांतर्गत मंजूर होणाऱ्या पाणी पुरवठा योजनांकरीता नियुक्त करण्यात येणाऱ्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांचे शुल्काची तरतूद देखभाल व दुरुस्ती अंदाजपत्रकात करण्याचा प्रस्ताव मा.संचालक मंडळाच्या बैठकीत कार्यक्रम बाबीद्वारे सादर करणेबाबत.

**सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची मा.संचालक मंडळास अवगत केले.**

महाराष्ट्र राज्यात काही नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पाणी पुरवठा केंद्रे चालविली जातात. सदर पाणी पुरवठा केंद्रातून मजीप्रामार्फत पाणी पुरवठा करण्यात येऊन पाणीपट्टीची

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

वसुलीही मजीप्रामार्फत करण्यात येते, त्यामुळे सदर पाणी पुरवठा केंद्रे ही मजीप्राची पाणी पुरवठा केंद्रे म्हणून ओळखली जातात.

नागरी भागातील मजीप्रामार्फत चालविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा केंद्राच्या शहरांकरिता (नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता) नगर विकास विभागामार्फत अमृत तसेच नगरोत्थान महाअभियानांतर्गत पाणी पुरवठा प्रकल्प मंजूर करण्यात येतात. नगर विकास विभागामार्फत अमृत तसेच नगरोत्थान महाअभियानांतर्गत मंजूर करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा प्रकल्पांमध्ये केंद्र शासन, राज्य शासन त्याचबरोबर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा घेण्यात येतो. सदर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा त्याचबरोबर प्रकल्प व्यवस्थापन शुल्क हे संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने भरावयाचे असते.

मजीप्रामार्फत चालविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा केंद्राची मालकी मजीप्राची असल्याने अमृत तसेच नगरोत्थान महाअभियानांतर्गत शहरांकरिता मंजूर होणाऱ्या पाणी पुरवठा प्रकल्पांतील स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा हा मजीप्राच्या घसारा निधीतून उभारण्यात येतो.

- **प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या नियुक्तीबाबत प्रादेशिक विभागाचे प्राप्त अभिप्राय :**

१. रिक्त पदावर नियमित/कंत्राटी/करार पध्दतीने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती केल्यास प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्ती न करता कामे करणे शक्य होईल व शासनाचा प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारावर होणारा खर्च बऱ्याच प्रमाणात कमी होईल. कार्यरत तांत्रिक मनुष्यबळ कमी असल्याने विवक्षीत कामाकरिता करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या अभियंत्याकडून कामे करुन घेणे शक्य होईल. उप अभियंता व्यतिरिक्त शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता व सहाय्यक अभियंता यांची नितांत आवश्यकता आहे. कनिष्ठ अभियंता व शाखा अभियंता, पदे आवश्यक असल्याने शासनाच्या धोरणानुसार १०% मंजूर पदा व्यतिरिक्त विशेष बाब म्हणून वाढीव १०% म्हणजेच एकूण २०% पदे भरण्याबाबत मंजूरी देणे उचित राहील.

२. सेवानिवृत्त शाखा अभियंता यांची मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असून सेवानिवृत्त शाखा अभियंता विवक्षीत कामाकरिता नियुक्ती देण्यासंबंधी रिक्त पदापैकी १०% पदांना फक्त विवक्षीत कामाकरिता नियुक्ती देण्याची तरतूद असल्यामुळे सदर संख्या कामाच्या तुलनेत खूप कमी आहे. तसेच आजपर्यंतच्या अनुभवानुसार विवक्षीत कामासाठी जाहिरात दिल्यानंतरही निवृत्त अभियंता प्रतिसाद देत नाही. जे प्रतिसाद देतात ते प्रत्यक्षात त्यांच्या जिल्ह्यातच कामे करण्यास इच्छुक असतात.

३. राज्य स्तरावर करारपध्दतीने अभियंत्यांची अंमलबजावणी केली तरी ते पुरेशे ठरतील असे वाटत नाही किंवा ते त्या ठिकाणी काम करण्यास इच्छुक असतील अशी परिस्थिती नाही किंवा ते त्या कामात तज्ञ असतील असे नाही.

४. योजनेचा सुसाध्यता अहवाल तयार करणे, सर्व्हेक्षण करणे, प्रकल्प अहवाल तयार करणे, कामाचे पर्यवेक्षण करणे, इत्यादी कामाकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराकडे आधुनिक संसाधणे (Instrument, DGPS, Softwares इत्यादी) उपलब्ध असतात.

५. नगरोत्थान कार्यक्रमांतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार चार्जेसचा समावेश योजनेमध्ये असतो त्यामुळे

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

त्याचा भूर्दंड मजीप्राला पडणार नाही. अमृत कार्यक्रमांतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार चार्जेसचा समावेश योजनेमध्ये नसतो, परंतू प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार चार्जेस प्रदान करण्याची जबाबदारी त्या-त्या स्थानिक स्वराज्य संस्थेची राहील असे निर्देश आहेत.

६. उपरोक्त पदा व्यतिरिक्त डाटा एंट्री ऑपरेटर पदे सुध्दा भरणे आवश्यक आहे.

- संपूर्ण महाराष्ट्र राज्यात सद्य:स्थितीत जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत मोठ्या प्रमाणात पाणी पुरवठा योजनांची कामे मजीप्रामार्फत प्रगतीपथावर असून याकरीता मजीप्राकडील संपूर्ण मनुष्यबळ कार्यरत आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सध्या उपलब्ध असणाऱ्या अपुऱ्या मनुष्यबळामुळे विविध कामांकरिता आवश्यकता भासल्यास कामे विहित वेळेत पूर्ण करण्याकरिता कामाची निकड विचारात घेता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची सुध्दा नियुक्ती करावी लागत आहे व हे मजीप्राच्या दृष्टीने हितावह आहे. सदर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या नियुक्तीबाबत पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात येत आहे.

- **ठराव :**

**असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या** मालकीच्या नागरी पाणी पुरवठा केंद्रासाठी अमृत व नगरोत्थान महाअभियानांतर्गत नव्याने मंजूर होणाऱ्या वाढीव पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीकरिता आवश्यकतेनुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करण्यास **खालील अटींच्या अधिन राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे**.

१. मजीप्राकडे सद्य:स्थितीत उपलब्ध असलेले कमी मनुष्यबळ विचारात घेता, नव्याने प्रस्तावित करावयाच्या योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, योजनेस शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर निर्गमित शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार निविदेबाबतची कार्यवाही करणे व योजनेचे सुपरव्हिजन करणे इत्यादी कामासाठी पुढील १ वर्षाच्या कालावधीसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्त करण्यात यावी.

२. मजीप्राच्या मंजूर आकृतीबंधानुसार आवश्यक असणाऱ्या कर्मचाऱ्यांची भरती सदर १ वर्षाच्या कालावधीत पूर्ण करावी जेणेकरुन योजनेच्या पुढील अंमलबजावणीकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची आवश्यकता भासणार नाही. सध्याचा मंजूर आकृतीबंध कार्यभारानुसार सुधारित करण्यासाठी समिती गठीत करण्याची कार्यवाही व त्याअनुषंगाने लागणारे शुल्क मंजूर करण्यास्तव सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्तनुसार नियुक्त करण्यात येणाऱ्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या शुल्काची तरतूद पाणी पुरवठा केंद्राच्या देखभाल व दुरुस्ती अंदाजपत्रकात करण्यात यावी.

४. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती केल्यानंतर त्यापोटी होणाऱ्या खर्चाच्या अनुषंगाने योग्य ती वाढ पाणीपट्टीच्या दरामध्ये करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

५. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या नियुक्तीबाबतचा प्रस्ताव सर्व आवश्यक माहिती व तपशीलासह सदस्य सचिव कार्यालयास सादर करुन त्यास मान्यता घ्यावी.

६. अमृत २ कार्यक्रमांतर्गत मंजूर होणाऱ्या पाणी पुरवठा योजनांच्याबाबतीत प्रकल्प व्यवस्थापन

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

सल्लागाराच्या खर्चाची तरतूद नसल्याने याबाबतचा प्रस्ताव नगरविकास विभागास सादर करावा.

७. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची १ वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी आवश्यकता भासल्यास त्याबाबतची पडताळणी करुन पुढील मुदतवाढ देण्याची कार्यवाही सदस्य सचिव स्तरावरुन करण्यात यावी.

उपरोक्तनुसार याबाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.७ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने राज्य सार्वजनिक उपक्रमाचा तात्पुरता शिल्लक निधी गुंतवणूक करण्याबाबतचे शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राष्ट्रीयकृत व खाजगी बँकांमध्ये केलेल्या गुंतवणूकीची माहिती संचालक मंडळास सादर करणेबाबत.

**प्रस्तावना :-**

राज्य सार्वजनिक उपक्रमांनी त्यांच्याकडे शिल्लक असणारा निधी योग्यरितीने गुंतविण्यासाठी शासनाने वित्त विभाग शासन निर्णय दि.०६.०८.२०२२ नुसार मार्गदर्शक तत्वे विहित केलेली आहेत. त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा शिल्लक निधी अल्प/दिर्घ मुदतीसाठी गुंतवणुक करण्याबाबत संचालक मंडळाच्या दि.२९.०३.२००३ मध्ये झालेल्या ९४ व्या बैठकांमधील कार्यक्रम बाब क्र.२२ अन्वये कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांच्या सल्ल्याने सदस्य सचिव यांच्या मान्यतेने अल्प मुदत व दीर्घ मुदतीसाठी केलेल्या गुंतवणुकीची माहिती मजीप्राच्या संचालक मंडळाच्या नंतरच्या बैठकीमध्ये सादर करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि.१५.०२.२०१६ च्या १३५ व्या बैठकीत एक वर्षापर्यंतच्या अल्प मुदतीची गुंतवणुक करण्यासाठी १) मा सदस्य सचिव २) संचालक (वित्त) यांची समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीद्वारे दि.०१.०९.२०२१ ते दि. ३१.१०.२०२३ या कालावधीत केलेल्या अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणुकीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १५५ व्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील शिल्लक निधी शासन निर्णय, वित्त विभाग क्र. शासाउ-१०.१५/प्र.क्र.४२/सा.उ., दि.२७.१०.२०१५ अन्वये गुंतवणुकीबाबत सुधारीत मार्गदर्शक तत्वे व सूचना विहित करण्यात आल्या. तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्र. संकीर्ण-२०२०/ प्र.क्र.५१/२०/कोषा प्रशा-५, दि.१३.०३.२०२० व शासन निर्णय, वित्त विभाग क्र.संकीर्ण २०२२/प्र.क्र.१२३/२२/कोषा-प्रशा ५ दि.२२.११.२०२३ मधील मार्गदर्शक तत्वांनुसार दि.०१.११.२०२३ ते दि.२८.०२.२०२६ या कालावधीत संचालक (वित्त) यांच्या सल्ल्याने व सदस्य सचिव यांच्या मान्यतेने वेळोवेळी राष्ट्रीयकृत व खाजगी बँकेमध्ये अल्प मुदतीसाठी गुंतवणूक करण्यात आलेली आहे. दि.०१.११.२३ ते दि.२८.०२.२०२६ या कालावधीत कोणतीही दीर्घ मुदतीची गुंतवणूक करण्यात आलेली नाही.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

यास अनुसरून दि.०१.११.२०२३ ते दि.२८.०२.२०२६ या कालावधीतील अल्प मुदतीसाठी केलेल्या एकूण ७४ गुंतवणुकीची स्थिती संचालक मंडळास माहितीसाठी सादर करण्यात आली. त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव:-**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दि.०१.११.२०२३ ते दि.२८.०२.२०२६ या कालावधीत केलेल्या अल्प मुदतीच्या गुंतवणुकीचे अवलोकन करण्यात येऊन त्यास मान्यता दिली.

**कार्यक्रम बाब क्र.८ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने राज्य सार्वजनिक उपक्रमाचे शिल्लक निधीची खाजगी बँकांमध्ये मुदत ठेव गुंतवणूक करण्यावर मर्यादा निश्चित करण्यास संचालक मंडळाची मान्यता घेणेबाबत.

**प्रस्तावना :-**

वित्त विभाग शा.नि.क्र.संकीर्ण २०२२/प्र.क्र.१२३/२२/कोषा-प्रशा ५ दि.२२.११.२०२३ अन्वये शासकीय कार्यालयांच्या आणि सार्वजनिक उपक्रम/महामंडळ यांच्या बँकींग विषयक व्यवहारांसाठी व त्यांच्याकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणुकीसाठी राष्ट्रीयकृत बँकांसोबतच खाजगी बँकांना (अनुसूचित वाणिज्यिक बँकांना सुध्दा) विहीत निकषांची पुर्तता करण्याच्या अटीवर पात्र ठरविण्यास शासनाने मान्यता दिली आहे. गुंतवणूक निर्णय घेताना बँकांचे व्यावसायिक मूल्यांकन महत्वाचे आहे. बँकेची निवड करताना संबंधित सक्षम प्राधिका-यांनी सदर निकषांची पुर्तता होत असल्याची खात्री करुन जाणीवपूर्वक निर्णय घ्यावा अशी तरतूद आहे.

दिनांक २७.१०.२०१५ च्या शासन निर्णयानुसार अतिरिक्त निधी गुंतविण्याबाबत कोणताही निर्णय घेण्यापूर्वी योग्य असे व्यावसायिक मूल्यमापन करण्यात यावे. सार्वजनिक उपक्रमांनी अतिरिक्त निधी फक्त विशिष्ट व्याजदर प्राप्त होण्याच्या दृष्टीने विशिष्ट कालावधीसाठी गुंतवू नये अशी तरतूद आहे. गुंतवणुक मिळण्याकरिता काही खाजगी बँका अधिक आकर्षक व्याजदर देत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे व्यावसायिक मुल्यमापनाबरोबर गुंतवणूक करताना जोखीम विचारात घेवून सुरक्षित गुंतवणूक करणे महत्वाचे आहे. त्यामुळे गुंतवणूकीच्या सुरक्षेच्या दृष्टीने अतिरिक्त निधी गुंतवणूक करताना एकाच बँकेत गुंतवणूक न करता अनेक बँकेत अतिरिक्त निधीची गुंतवणूक करून जोखीम कमी करणे आणि निधीची संतुलित गुंतवणूक सुनिश्चित करणे योग्य राहील.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३५ व्या बैठकीत एक वर्षापर्यंतच्या अल्प मुदतीची गुंतवणुक करण्यासाठी १)सदस्य सचिव २)संचालक (वित्त) यांच्या समितीस तसेच दिर्घ मुदतीची गुंतवणूक संचालक मंडळास अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

तरी गुंतवणुकीतील संभाव्य जोखीम कमी करण्यासाठी खाजगी बॅकांमध्ये गुंतवणूक करताना खालीलप्रमाणे मर्यादा निश्चित करणे विचाराधीन होते.

१. सार्वजनिक बँकांमधील गुंतवणुकीसाठी कोणतीही मर्यादा राहणार नाही.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

२. खाजगी बॅंके पैकी एच डी एफ सी बॅंक व आय सी आय सी आय बॅंकेस RBI Press Release २०२५-२६/१६-१३, दिनांक ०२.१२.२०२५ अन्वये भारतीय रिझर्व बॅंक द्वारे Domestic Systemically Important Bank (D-SIBs) म्हणून घोषित करण्यात आले असल्याने मजीप्राच्या अतिरिक्त निधीची गुंतवणूक करताना राष्ट्रीयकृत बॅंकेनुसार गुंतवणूक करण्यात यावी.
३. एच डी एफ सी बॅंक व आय सी आय सी आय बॅंके व्यतिरिक्त इतर खाजगी बॅंकांमध्ये होणारी एकूण गुंतवणूक ही मजीप्राच्या एकूण गुंतवणुकीच्या ५०% पर्यंत मर्यादित असावी.
४. एका खाजगी बॅंकेतील गुंतवणुक ही खाजगी बॅंकेतील एकूण गुंतवणुकीच्या १५% पर्यंत मर्यादित असावी.

या विषया संदर्भात संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. शासन निर्णय वित्त विभाग दि.२७.१०.२०१५ मधील तरतुदीनुसार तसेच सिडको (CIDCO) कार्यालयाने ६५३ व्या बैठकीत मंजूर केलेल्या ठराव क्र.१२९९८ च्या धर्तीवर बॅंकेमधील गुंतवणूकीबाबत मर्यादा निश्चित करता येईल.

**ठराव:-**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अतिरिक्त निधीची गुंतवणुक करताना संभाव्य जोखीम कमी करण्यासाठी खाजगी बॅंकांमध्ये गुंतवणूक करण्यास खालील मर्यादा निश्चित करण्यात येत आहे.

१. सार्वजनिक बॅंकांमधील गुंतवणुकीसाठी कोणतीही मर्यादा राहणार नाही.
२. खाजगी बॅंके पैकी एच डी एफ सी बॅंक व आय सी आय सी आय बॅंकेस RBI Press Release २०२५-२६/१६-१३, दिनांक ०२.१२.२०२५ अन्वये भारतीय रिझर्व बॅंक द्वारे Domestic Systemically Important Bank (D-SIBs) म्हणून घोषित करण्यात आले असल्याने मजीप्राच्या अतिरिक्त निधीची गुंतवणूक करताना राष्ट्रीयकृत बॅंकेनुसार गुंतवणूक करण्यात यावी.
३. एच डी एफ सी बॅंक व आय सी आय सी आय बॅंके व्यतिरिक्त इतर खाजगी बॅंकांमध्ये होणारी एकूण गुंतवणूक ही मजीप्राच्या एकूण गुंतवणुकीच्या ५०% पर्यंत मर्यादित असावी.
४. एका खाजगी बॅंकेतील गुंतवणुक ही खाजगी बॅंकेतील एकूण गुंतवणुकीच्या १५% पर्यंत मर्यादित असावी.
५. एखाद्या बॅंकेसंदर्भात आर्थिक घोटाळा (Scam) निदर्शनास आल्यास, संबंधित बॅंकेत केलेल्या गुंतवणूका मुदतपूर्व काढून घेण्याचा तसेच नवीन गुंतवणूक न करणेबाबत संचालक (वित्त) यांनी तपासून सदस्य सचिव यांच्या मंजूरीने पुढील कार्यवाही करावी.

**कार्यक्रम बाब क्र.९ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे आर्थिक वर्ष सन २०२४-२५ चे सुधारीत आर्थिक वर्ष सन २०२५-२६ च्या जमा खर्चाचे मुळ अंदाजपत्रक तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे आर्थिक वर्ष २०२५-२६ चे सुधारीत व आर्थिक वर्ष २०२६-२७ चे च्या जमा खर्चाचे मुळ अंदाजपत्रक मा.संचालक मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करणेबाबत.

**१.** <u>महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची रचना आणि कार्य व कर्तव्य</u> - :

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

१.१ राज्यातील नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा आणि मलनि:सारण कार्यक्रमांचा जलद गतीने विकास व नियमन करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र अधिनियम क्र.XLVIII, १९७६ अन्वये महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाची स्थापना नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारित करण्यात आली. तद्नंतर दि.०१.११.१९७९ रोजी नगर विकास विभागाच्या अखत्यारित असलेल्या परिसर अभियांत्रिकी विभागाचे सर्व अधिकारी/कर्मचारी (वर्ग-१ ते ४), मत्ता व दायित्वासह हस्तांतरण या मंडळाकडे करण्यात आले. नागरी व ग्रामीण क्षेत्रात पिण्याचे शुध्द पाणी देण्याच्या राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी बृहत आराखडयाच्या पार्श्वभूमीवर मार्च १९९७ मध्ये वरील अधिनियमात दुरुस्ती करुन सदर मंडळाचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (मजीप्रा) असे नामकरण करण्यात आले.

१.२ १ नोव्हेंबर, १९७९ रोजी नगर विकास व सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागातून (UDPHED) परिसर अभियांत्रिकी हा भाग विलग करुन त्या सेवांसाठी स्वतंत्र बोर्ड (MWSSB) करण्यात आले. परंतू या MWSSB वर नगर विकास विभागाचे प्रशासकीय नियंत्रण होते व नगर विकास विभागाची तांत्रिक शाखा म्हणूनच MWSSB कार्यरत होते. नगर विकास विभाग व ग्राम विकास विभाग यांची विभागणी करुन पाणी पुरवठा व स्वच्छता या स्वतंत्र विभागाची स्थापना ९ नोव्हेंबर १९९५ रोजी करण्यात आली.

१.३ राज्यातील पाणी पुरवठा आणि मलनि:सारण योजनांचे संकल्पन, अंमलबजावणी आणि आवश्यकतेनुसार काही योजनांची देखभाल व दुरुस्ती मजीप्रामार्फत करण्यात येते. राज्यामध्ये मजीप्रा ही पाणी पुरवठा व मलनि:सारण क्षेत्रातील तांत्रिक व व्यवस्थापकीय कौशल्य असलेली महत्वाची व एकमेव राज्यस्तरीय यंत्रणा आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची कार्य व कर्तव्य महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम, १९७६ मधील कलम १४ अन्वये विहीत करण्यात आलेली आहेत.

१.४ पाणी पुरवठा व स्वच्छता या नवीन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली (MWSSB) देण्यात आले. ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने शासनाने सन २००० पासून पाणी पुरवठा क्षेत्रासाठी "मागणी आधारित" योजनांच्या अंमलबजावणीचे धोरण स्वीकारलेले आहे. त्यानुषंगाने या क्षेत्रातील योजनांबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका महत्त्वाची ठरली. सद्य:स्थितीत "मागणी आधारित सामुदायिक सहभागाच्या तत्वावर" पाणी पुरवठा व मलनि:सारण योजना राबविण्याचे धोरण राबविले जात आहे.

२. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची आस्थापना -: महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ अन्वये प्राधिकरणाची आस्थापना विहीत करण्यात आलेली आहे.

२.१ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मधील कलम २३ व २३ (अ) मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र परिसर अभियांत्रिकी सेवेतील सर्व अधिकारी/कर्मचारी त्याचप्रमाणे अतांत्रिक संवर्गातील जे कर्मचारी प्राधिकरणाच्या सेवेमध्ये कायमस्वरुपी समाविष्ट झाले, अशा सर्व कर्मचाऱ्यांना शासनाचे सर्व सेवा नियम व इतर सर्व सवलती जशाच्या तशा लागू आहेत, ही तरतूद विचारात घेऊन शासनाच्या नगर विकास विभागाचे पत्र क्र.एसीटी-१३८२/४८/सीआर-२४१/युडी.१५ दि.२१.०१.१९८४ अन्वये शासनाचे सर्व सेवा नियम व इतर फायदे प्राधिकरणातील सर्व अधिकारी/ कर्मचाऱ्यांना जसेच्या तसे लागू केलेले आहेत.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

२.२ पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. मजीप्रा-२०१४/ प्र.क्र. ३३(अ)/पापु-२३, दि. २३ मार्च, २०१७ अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांच्या नियमित वेतन व भत्याचे दायित्व तसेच सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या निवृत्ती वेतनाचे दायित्व शासनाने खालील प्रमाणे स्वीकारले आहे.

१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे प्राधिकरण म्हणून स्वायत्त होण्यापूर्वी जे अधिकारी/कर्मचारी शासकीय अधिकारी/कर्मचारी म्हणून नियुक्त झाले होते, अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते व निवृत्तीवेतन राज्य शासनामार्फत अदा करण्यात येईल.

२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे प्राधिकरण स्वायत्त संस्था स्थापन झाल्यानंतर प्राधिकरणामध्ये जे अधिकारी/कर्मचारी नियुक्त झालेले आहेत, अशा अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते व निवृत्ती वेतनावरील खर्च पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या मंजूर अंदाजपत्रकीय तरतुदीमधून भागविण्यात येईल. त्याकरीता मजीप्रास ईटीपी व तांत्रिक सेवा शुल्कापोटी प्राप्त होणारे उत्पन्न प्राधिकरणाने शासनाकडे दरमहा जमा करावे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन नियमितपणे होण्यासाठी महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र.मजीप्रा-२०१४/प्र.क्र.३३(अ)/ पापु-२३, दि.२३.०३.२०१७ अन्वये पुढीलप्रमाणे कार्यप्रणाली ठरविण्यात आली आहे.

१. मजीप्रातील अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन इतर शासकीय कर्मचा-यांप्रमाणे नियमितपणे दरमहा करण्यात यावे.

२. वेतन व भत्ते या संज्ञेत अनुज्ञेय खर्चाची तरतूद प्राधिकरण स्वायत्त होण्यापूर्वी प्राधिकरणातील शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्रपणे व प्राधिकरण स्वायत्त झाल्यानंतर प्राधिकरणातील अधिकारी/ कर्मचारी यांच्यासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने करावी व या तरतुदीपोटी प्रत्येक महिन्यास आवश्यक निधी प्राधिकरणास विभागाने उपलब्ध करुन द्यावा.

३. वेतनासाठी स्वतंत्र तरतूद केलेली असल्याने, प्रत्येक महिन्यातील उत्पन्न व खर्चाचे विवरणपत्र शासनास सादर करताना दोन्ही लेखाशीर्षावरील खर्च स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावा.

४. वेतन व भत्त्यांचे दायित्व राज्य शासनाने स्वीकारले आहे, हे विचारात घेता शासनाच्या खर्चात करावयाच्या काटकसरीचे आदेश प्राधिकरणाला जसेच्या तसे लागू राहतील.

**अटी :-**

अ) उपरोक्त शासन निर्णयानुसार दि.२३.३.२०१७ पूर्वीच्या वेतन/भत्त्या संदर्भातील कोणत्याही थकीत रकमांचे दायित्व शासनाने स्विकारले नसल्यामुळे या दिनांकापूर्वीच्या वेतन/भत्त्यासंदर्भातील कोणत्याही थकबाकीसाठी या निधीचा वापर करु नये.

निवृत्ती वेतनासाठी महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे लेखाशिर्ष क्र.२२१५A०५२ मधून तरतुद करण्यात येत आहे.

ब) उपरोक्त शासन निर्णयानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास ईटीपी व तांत्रिक सेवा शुल्कापोटी प्राप्त होणारे उत्पन्न प्राधिकरणाने शासनाकडे दरमहा जमा करावे. शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनेनुसार व शासन अटीनुसार

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ईटीपी व तांत्रिक सेवा शुल्क शासनास सन २०२४-२५ मध्ये खालील प्रमाणे भरणा केलेला आहे.

| सन २०२४-२५ | | | | | (आकडे रु. लक्ष) | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | महिना | ईटीपी | तांत्रिक शुल्क | एकुण | चलन क्रमांक | दिनांक |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | एप्रिल २०२४ | १७६.९६ | ५२८.७२ | ७०५.६८ | T.N.००७१४० | १०.०७.२०२४ |
| २ | मे २०२४ | १३०.६२ | १३५.८३ | २६६.४५ | T.N.००७१४० | १०.०७.२०२४ |
| ३ | जून २०२४ | ८२.३४ | १३४२.८३ | १४२५.१७ | T.N.००८०३९ | २३.०७.२०२४ |
| ४ | जुलै २०२४ | १३१.२८ | १४१८.०२ | १५४९.३० | T.N.०१०९३० | ०३.०९.२०२४ |
| ५ | ऑगस्ट २४ | १५३.९८ | १३६३.४३ | १५१७.४१ | T.N.०१४१६९ | १९.१०.२०२४ |
| ६ | सप्टेंबर २४ | ११.३२ | १७५२.२७ | १७६३.५९ | T.N.०१६२८७ | ३०.११.२०२४ |
ब)    उपरोक्त शासन निर्णयानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास ईटीपी व तांत्रिक सेवा शुल्कापोटी प्राप्त होणारे उत्पन्न प्राधिकरणाने शासनाकडे दरमहा जमा करावे. शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनेनुसार व शासन अटीनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ईटीपी व तांत्रिक सेवा शुल्क शासनास भरणा केलेला आहे.

**२.३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास दि. ०१.०४.२०१७ पासून सुधारित वेतन श्रेणीनुसार ७ वा वेतन आयोग लागू केला आहे.**

महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र.मजीप्रा-१११९/ प्र क्र.६५/ पापु-२३ दि.२३.०९.२०२१ नुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतन/भत्यांचे दायित्व शासनाने दिनांक २३ मार्च, २०१७ पासुन स्विकारले असल्यामुळे, एप्रिल, २०१७ पासुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना ७व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने सुधारित वेतन संरचना मंजुर करण्यात आली आहे. परंतु दि.०१.१०.२०२१ पासून सुधारित वेतनश्रेणीप्रमाणे प्रत्यक्षात वेतन अदा करण्याबाबत आदेशित केले.

महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र.मजीप्रा-१११९/ प्र क्र.०६५/ पापु-२३ दि.२३.०९.२०२१ अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दि.०१.१०.२०२१ पासून सातव्या वेतन आयोगानुसार निवृत्ती वेतन/कुटुंब निवृत्तीवेतन देण्यात आले. तरी त्यांची खालीलप्रमाणे थकबाकी आहे.

शासनाने ७ वा वेतन आयोग लागू केल्यामुळे वेतनाच्या थकबाकीसाठी नियमित कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्तेबाबत शासनाचे दायित्व राहणार आहे. तसेच रुपांतरीत कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्तेबाबत मजीप्राचे दायित्व राहणार आहे.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे देय निवृत्तीवेतनाच्या थकबाकीचे ५ हप्ते व निवृत्ती उपदान/मृत्यूउपदान अंशराशीकरणाच्या फरकाचा निधी रक्कम रु.१४१.९० कोटी शासनाकडून प्राप्त झाले आहेत. तथापी अद्याप कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी ७ वा वेतन आयोगाप्रमाणे देय फरकाचा फक्त १ ला हप्ता रु.२१.८१ कोटी प्राप्त असून उर्वरीत ४ हप्त्यांची मिळून एकत्रित रक्कम रु.७६.४० कोटी रक्कम शासनाकडून मजीप्राला वितरीत करण्यात आलेली नाही.

## <u>भाग – २</u>

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे आर्थिक वर्ष २०२५-२६ चे सुधारित व आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या जमा खर्चाचे मूळ अंदाज :-**

प्रस्तावना :-    महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मधील कलम १५(२) (ग) अन्वये प्राधिकरणाला स्वत:चे अंदाजपत्रक बनविण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. हे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मधील ३४(१) नुसार शासनाच्या पूर्व मंजूरीने अंमलात आणण्याची तरतूद आहे.

<u>प्राधिकरणाचे अंदाजपत्रक दोन भागात विभागलेले आहे.</u>

**३. महसूली :- महसूल भागात महसूली जमा व महसूली खर्च,**

**४. भांडवली :- भांडवली भागात भांडवली जमा व भांडवली खर्च यांचा समावेश आहे.**

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**१. कार्यक्रमांचे विश्लेषण :**

शासनाने म.जी.प्रा. कर्मचा-यांचे वेतन व भत्ते तसेच निवृत्ती वेतनाचे दायित्व स्विकारले असून शासन अनुदानातून वेतन व भत्ते आणि निवृत्तीवेतनावरील खर्च करण्यात येईल. शासनाच्या आदेशानुसार मजीप्राचे ई.टी.पी. व तांत्रिक सेवा शुल्कचे उत्पन्न दरमहा शासन खाती भरणा करण्यात येत आहे. सध्या प्रगतीपथावर असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची कामे पूर्ण होण्याच्या मार्गावर असल्याने ई.टी.पी. कमी जमा होत आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये २० ग्रामीण व २२ नागरी अशा मिळून ४२ योजना चालविण्यात आलेल्या आहेत. जालना ग्रामीण विभागाची १७३ गावे व ९५ गावे या २ योजनांची कार्यक्रम बाब बैठकीत मान्यतेसाठी ठेवली आहे. तरी आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये २२ ग्रामीण व २१ नागरी अशा मिळून ४३ पाणी पुरवठा योजना मजीप्रा चालविणार आहे. नागपूर ज.व्य.मधील महादुला नागरी योजना हस्तांतरीत झाली आहे. पाणी पुरवठा केंद्रावरील जमा व खर्चाचा २०२५-२६ व २०२६-२७ च्या अंदाजपत्रकात समावेश आहे. योजनांमधुन जमा होणाऱ्या पाणी पट्टीतून पाणी पुरवठा केंद्रांचा खर्च अपेक्षित आहे.

**२. महसुली जमा व खर्च अंदाज :**

आर्थिक वर्ष २०२५-२६ सुधारित व आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये अनुक्रमे रु.१४०३.५७ कोटी व रु.१७९५.२९ कोटी महसुली जमा तर रु.१३९३.२३ कोटी व रु.१७७५.९१ कोटी महसुली खर्च अपेक्षित आहे. विवरणपत्र १ व २ मध्ये त्याबाबत सविस्तर तपशिल दर्शविला आहे.

**अ) महसूली जमा : (विवरणपत्र १)**

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये रु.१४०३.५७ कोटी (शासन अनुदान रु.१०४६.५७ कोटी व मजीप्रा उत्पन्न रु.३५७.०० कोटी) व व आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये रु.१७९५.२९ कोटी (शासन अनुदान रु.१४०२.५८ कोटी व मजीप्रा उत्पन्न रु.३९२.७१ कोटी) महसुली जमा अंदाज आहेत. मजीप्रा महसुली जमेमध्ये मुख्यत्वे प्रकल्प सल्लागार सेवा तसेच PDMC मधून मिळणारे उत्पन्न तसेच नागरी व ग्रामीण पाणी विक्रीतून मिळणारे विलंब आकारासह उत्पन्न, तात्पुरत्या ठेवी वरील व्याज, इमारत भाडे उत्पन्न, निवासी वसाहतींना लागणारे भांडवली जमा अंशदान, तसेच इतर किरकोळ जमा जसे निविदा विक्री/दंड, भंगार विक्री व इतर संकीर्ण महसूल इत्यादींचा समावेश महसुली जमे मध्ये होतो.

**ब) महसूली खर्च : (विवरणपत्र २)**

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये रु. १३९३.२३ कोटी (अनुदानातून खर्च रु.१०४६.५७ कोटी व मजीप्रा खर्च रु.३४६.६६ कोटी) व आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये रु.१७७५.९१ कोटी (अनुदानातून खर्च रु.१४०२.५८ कोटी व मजीप्रा खर्च रु.३७३.३३ कोटी) महसुली खर्च अपेक्षित आहे. विवरणपत्र १ व २ मध्ये त्याबाबत सविस्तर तपशिल दर्शविला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील कार्यरत व सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी (रुपांतरीत कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते वगळून) राज्य शासनाकडून अनुदान प्राप्त होते. शासनाकडून मिळणाऱ्या सदर अनुदानातून खर्च तसेच प्रवास, वैद्यकीय खर्च भरपाई, गणवेष व वर्दी, संगणक प्रशिक्षण, मुद्रण, जाहिरात व प्रसिद्धी, दूरध्वनी व तार, पुस्तके व नियतकालिके, वीज व पाणीपट्टी, भाडेपट्टी व कर, लेखापरिक्षण शुल्क, सल्लागार सेवा खर्च, बँक खर्च, कार्यालयीन खर्च, कायदेविषयक शुल्क, संगणक देखभाल व दुरूस्ती, कंत्राटी कामगार वेतन, वाहन देखभाल व

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

दुरूस्ती, वाहन भाडे खर्च, इमारत देखभाल व दुरूस्ती, मालमत्तेवरील घसारा आकार, संगणक प्रणाली विकसित करणे, अपंग व्यक्ती अनुदान या सर्व बाबींकरीता सन २०२५-२६ करीता रु.७३.३२ कोटी व सन २०२६-२७ करीता रु.८५.८६ कोटी एकूण महसुली खर्च अपेक्षित आहे. तसेच नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा केंद्राची देखभाल व दुरुस्ती स्थापत्य व यांत्रिकीसह यात कंत्राटी मनुष्यबळ सेवा, विद्युत, रसायन, रॉयल्टी, पाणी तपासणी, पाटबंधारे देयक, घसारा आकार इत्यादी करीता सन २०२५-२६ करीता रु.२७३.३४ कोटी व सन २०२६-२७ करीता रु.२८७.४७ कोटी एकूण महसुली खर्च अपेक्षित आहे.

**३. <u>भांडवली जमा व खर्च अंदाज</u> :**

आर्थिक वर्ष २०२५-२६ सुधारित व आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये अनुक्रमे रु.५४४.२४ कोटी व रु.५५१.३७ कोटी भांडवली जमा तर रु.५५४.५८ कोटी व रु.५५५.८७ कोटी भांडवली खर्च अपेक्षित आहे. विवरणपत्र ३ व ४ मध्ये त्याबाबत सविस्तर तपशिल दर्शविला आहे.

**अ) <u>भांडवली जमा</u> : (विवरणपत्र ३)**

आर्थिक वर्ष २०२५-२६ चे सुधारित व आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये अनुक्रमे रु.५४४.२४ कोटी व रु.५५१.३७ कोटी भांडवली जमा अपेक्षित आहे. विवरणपत्र ३ व ४ मध्ये त्याबाबत सविस्तर तपशिल दर्शविला आहे. भांडवली जमेत मुख्यत्वेकरुन महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाकडून विविध योजनांकरीता मंजूर वित्तीय आकृतीबंधानुसार प्राप्त होणा-या योजनांतर्गत व योजनेतर अनुदानाचा समावेश आहे. महाराष्ट्र शासन नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजना तसेच जलनि:सारण योजनांसाठी शासन अंदाजपत्रकात अनुदानाची तरतुद करते, या तरतुदीनुसार प्राधिकरणाला वेळोवेळी योजना राबविण्यासाठी शासनाकडून अनुदान दिले जाते. तसेच पुढील कारणासाठी देखिल शासन अनुदान मिळते. जसे न्यायालयीन प्रकरणी भूसंपादन मोबदला/प्रतिपूर्ती, नगरोत्थान योजना, तिल्लारी योजना, जलस्वराज्य योजना, मराठवाडा ग्रीड योजना, LIC ग्रामीण कर्ज परतफेड हप्ता, इत्यादी तसेच हमी शुल्काची परतफेड, मा.संचालक मंडळाच्या मान्यतेनुसार घसारा निधीतून, घसारा निधी ठेवीवरील व्याज, पूर्ण ठेव योजनेची जमा, Water Gems & Sever Gems करीता Upgrade करणेबाबत व मजीप्रा पा.पु.यो. Imple.of E-Gover. Project इत्यादी रकमेचा समावेश भांडवली जमेत होतो.

**ब) <u>भांडवली खर्च</u> : (विवरणपत्र ४)**

आर्थिक वर्ष २०२५-२६ चे सुधारित व आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये अनुक्रमे रु.५५४.५८ कोटी व रु.५५५.८७ कोटी भांडवली खर्च अपेक्षित आहे. विवरणपत्र ३ व ४ मध्ये त्याबाबत सविस्तर तपशिल दर्शविला आहे. शासनाकडून मिळणारे योजनेवरील अनुदान व वित्तिय संस्थांकडून मिळणारे कर्ज इत्यादी द्वारे उपलब्ध निधी त्या त्या योजना राबविण्यासाठी वापरण्यात येतो. जसे न्यायालयीन प्रकरणी भूसंपादन मोबदला/प्रतिपूर्ती, नगरोत्थान योजना, तिल्लारी योजना, जलस्वराज्य योजना, मराठवाडा ग्रीड योजना, LIC ग्रामीण कर्ज परतफेड हप्ता, इत्यादी तसेच हमी शुल्काची परतफेड, मा.संचालक मंडळाच्या मान्यतेनुसार घसारा निधीतून, घसारा निधी ठेवीवरील व्याज, पूर्ण ठेव योजनेची जमा तसेच मजीप्रा स्वनिधीतून होणारा खर्च जसे नविन वाहन खरेदी, इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे खरेदी, नविन फर्निचर खरेदी, नविन संगणक खरेदी, नविन इमारत बांधकाम इत्यादी करीता

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

एकत्रित सन २०२५-२६ करीता रु.०.८३ कोटी व सन २०२६-२७ करीता रु.२.३८ कोटी), तसेच मा.संचालक मंडळाच्या मान्यतेनुसार स्वनिधीतून मजीप्रा देय हिस्सा/इतर स्वनिधीतून खर्च (सन २०२५-२६ करीता रु.९.५० व सन २०२६-२७ करीता रु.१७.०० कोटी), इत्यादी रकमेचा समावेश भांडवली खर्चात होतो.

**४. पाणी पुरवठा योजना :**

**अ) नागरी पाणी पुरवठा योजना :**

नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी शासनाने विहीत केलेल्या पध्दतीप्रमाणे आकृतीबंधानुसार खर्च करणे आवश्यक असते. त्यामध्ये शासकीय अनुदान - केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा आणि नगरपालिकांकडून भरावयाची लोकवर्गणी यांचा समावेश असतो. सद्यस्थितीत खालील केंद्र मजीप्रा मार्फत सुरू आहेत.

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये २२ तसेच आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये २१ नागरी पाणी पुरवठा योजना मजीप्रा मार्फत चालविण्यात येतात. (नागपूर ज.व्य.मधील महादुला योजना सन २०२५-२६ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेकडे हस्तांतरीत झाली.)

**नागरी पाणी पुरवठा केंद्र :-**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अंबरनाथ बदलापूर | गोवणे | न्हावा-शेवा | माथेरान | आंबोली | चाकण |
| लष्कर | पाचगणी | महाबळेश्वर | कारंजा | यवतमाळ | वेण्णा |
| चिखलदरा | अकोट | बल्लारपुर | अहेरी | आर्वी श्हर | एकूण २१ योजना |
| गोंदिया | संरक्षण साकोरा | इगतपुरी | अमरावती - बडनेरा | | |

**ब) ग्रामीण पाणी पुरवठा योजना :**

ग्रामीण पाणी पुरवठा योजना राबविण्यासाठी प्राधिकरणास राज्य शासनाकडून अनुदान मिळत नाही. तथापि पाणी विक्रीतून मिळणारे उत्पन्न व मजीप्राच्या स्वनिधीतून मिळणारे उत्पन्न यातून सदर खर्च केला जातो. सद्यस्थितीत खालील केंद्र मजीप्रा मार्फत सुरू आहेत.

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये २० तसेच आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये २२ ग्रामीण पाणी पुरवठा योजना मजीप्रा मार्फत चालविण्यात येतात. (जालना विभागाची १७३ गावे व ९५ गावे या २ योजनांची मुदत २०२६-२७ या वित्तीय वर्षात मा.संचालक मंडळाच्या बैठकीनुसार वाढविलेली आहे.)

**ग्रामीण पाणी पुरवठा केंद्र :-**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| जळोची | डोंगरगाव-कुसगाव | प्रादे.ताणंद | शिरभावी व ८१ गावे | प्रादे.गांधीनगर | १७३ ग्रीड गावे |
| नायगाव व ९ गावे | चांदवड व ४४ गावे | दहिवाळ व २५ गावे | माळमाथा व २५ गावे | मनोरा | ९५ ग्रीड गावे |
| १५६ गावे | १०५ गावे | ७९ गावे | लंघापूर ५७ | जळगाव-जामोद | एकूण २२ योजना |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| माळपठार व ४० गावे | नागपूर पेरी अर्बन | गोरेगाव | पिंपरी- मेघे | ओझर साकोरे | |

तरी आर्थिक वर्ष २०२५-२६ चा सुधारीत व आर्थिक वर्ष २०२६-२७ चा जमा व खर्चाचा मूळ अंदाज सोबतचे विवरणपत्र १, २, ३, ४ प्रमाणे प्रस्तावित आहे. वेतन व निवृत्तीवेतनाचा प्राधिकरणाने स्वनिधीतून केलेल्या खर्चाची शासनाकडून सन २०२६-२७ या आर्थिक वर्ष प्रतिपूर्ती अपेक्षित धरण्यात आलेली आहे.

| गोषवारा | | (रक्कम रु.कोटी) |
|---|---|---|
| तपशील | सुधारित अंदाज वित्तीय वर्ष २०२५-२६ | अर्थसंकल्पिय अंदाज वित्तीय वर्ष २०२६-२७ |
| १ | २ | ३ |
| महसुली जमा | १४०३.५७ | १७९५.२९ |
| भांडवली जमा | ५४४.२४ | ५५१.३७ |
| एकुण जमा | १९४७.८१ | २३४६.६६ |
| महसुली खर्च | १३९३.२३ | १७७५.९१ |
| भांडवली खर्च | ५५४.५८ | ५५५.८७ |
| एकुण खर्च | १९४७.८१ | २३३१.७८ |
| आधिक्य/तूट | ०.०० | +१४.८८ |

**म.जी.प्रा.ची आर्थिक स्थिती :** २०२५-२६ आर्थिक वर्षाची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची आर्थिक स्थिती खालील प्रमाणे राहीली आहे.

| **उत्पन्न** | | **खर्च** | |
|---|---|---|---|
| **तपशील** | **रु. कोटी** | **तपशील** | **रु. कोटी** |
| ई टी पी/तांत्रिक सेवा शुल्क/<br>पीएमसी/पीडीएमसी | १३४.४७ | प्रशासकीय खर्च | ७३.३२ |
| तात्पुरत्या गुंतवणूकीवरील व्याज | १३.८१ | शासनास करावयाची जमा | १०९.४० |
| पाणी विक्री<br>नागरी रु. २७६.०८ कोटी<br>ग्रामीण रु. ३०.३५ कोटी<br>विलंब आकार रु.०.७२ कोटी | ३०७.१५ | देखभाल दुरुस्ती<br>नागरी रु. १९४.९८ कोटी<br>ग्रामीण रु. ७८.३६ कोटी | २७३.३४ |
| शासनाकडून प्राप्त अनुदान<br>१)वेतन व भत्ते रु.२७७.६४ कोटी<br>२)निवृत्ती वेतन रु.५२६.३७ कोटी<br>३) भ.नि.नि.व्याज रु.२७.९६ कोटी<br>४) भ.नि.नि.ठेव रु.१०५.२० कोटी | ९३७.१७ | १)वेतन व भत्ते रु.२७७.६४ कोटी<br>२)निवृत्ती वेतन रु.५२६.३७ कोटी<br>३) भ.नि.नि.व्याज रु.२७.९६ कोटी<br>४) भ.नि.नि.ठेव रु.१०५.२० कोटी | ९३७.१७ |
| इतर | १०.९७ | | |
| **एकुण** | **१४०३.५७** | **एकुण** | **१३९३.२३** |

म.जी.प्रा.चे आर्थिक वर्ष २०२६-२७ करिता अर्थसंकल्पीय अंदाज पुढीलप्रमाणे राहिल.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| उत्पन्न | | खर्च | |
|---|---|---|---|
| **तपशील** | **रु . कोटी** | **तपशील** | **रु . कोटी** |
| ई टी पी/तांत्रिक सेवा शुल्क/ पीएमसी/ पीडीएमसी | १४७.९२ | प्रशासकीय खर्च | ८५.८६ |
| तात्पुरत्या गुंतवणूकीवरील व्याज | १५.२० | शासनास करावयाची जमा | १२०.३४ |
| पाणी विक्री<br>नागरी रु.३०३.६९ कोटी<br>ग्रामीण रु.३३.३९ कोटी<br>विलंब आकार रु.०.७९ कोटी | ३३७.८७ | देखभाल दुरुस्ती<br>नागरी रु.२०३.२६ कोटी<br>ग्रामीण रु.८४.२१ कोटी | २८७.४७ |
| शासनाकडून अपेक्षित अनुदान<br>१)वेतन व भत्ते रु.३०३.११ कोटी<br>२)निवृत्ती वेतन रु.९०६.५४ कोटी<br>३) भ.नि.नि.व्याज रु.२९.७९ कोटी<br>४) भ.नि.नि.ठेव रु.४२.८० कोटी | १२८२.२४ | १)वेतन व भत्ते रु.३०३.११ कोटी<br>२)निवृत्ती वेतन रु.९०६.५४ कोटी<br>३) भ.नि.नि.व्याज रु.२९.७९ कोटी<br>४) भ.नि.नि.ठेव रु.४२.८० कोटी | १२८२.२४ |
| इतर | १२.०६ | | |
| **एकूण** | **१७९५.२९** | **एकुण** | **१७७५.९१** |

| विवरणपत्र क्रमांक १ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | | | | | |
| आर्थिक वर्ष २०२५-२६ चे सुधारित व आर्थिक वर्ष २०२६-२७ चे मूळ अंदाज ( महसूली जमेचा तपशील ) | | | | | |
| ( रुपये लाखात ) | | | | | |
| | | २०२४-२५ | २०२५-२६ | | २०२६-२७ |
| अ. क्र | तपशील | प्रत्यक्ष जमा | मूळ तरतूद | सुधारीत जमा तरतूद (अंदाजित) | मूळ तरतूद (अंदाजित) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| अ | शासनाकडून वेतन, भत्ते व निवृत्ती वेतनासाठी अनुदान. | | | | |
| १ | म.जी.प्रा.च्या कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्यासाठी शासनाकडुन जमा अनुदान २२१५A०४१ | १६४२८.९४ | २७८१४.६० | २७७६४.०० | ३०३११.१८ |
| २ | म.जी.प्रा.च्या निवृत्ती वेतनासाठी जमा अनुदान २२१५A०५२ | ५४४९७.७६ | ५२२२८.०० | ५२६३६.९५ | ५७९२८.४८ |
| ३ | म.जी.प्रा.च्या निवृत्ती वेतन खर्चाची प्रतिपूर्ती अनुदान २२१५A०५२ | ०.०० | ३२७२६.०० | ०.०० | ३२७२६.०० |
| | एकूण अ (१+२+३) | ७०९२६.७० | ११२७६८.६० | ८०४००.९५ | १२०९६५.६६ |
| ब | शासनाकडून मिळणारे अन्य अनुदान | | | | |
| १ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कर्मचा-यांच्या भ.नि.नि.ठेव वरील व्याज अनुदान | २८०५.२४ | ३००४.४१ | २७९६.०० | २९७९.०० |
| २ | शासनाकडे जमा करण्यात आलेली महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचा-याची भ.नि.नि.ची ठेव जमा रक्कम | २५००.०० | ५०००.०० | १०५२०.०० | ४२८०.०० |
| ३ | प्रशिक्षणासाठी (मजीप्रा विभाग नाशिक मित्रा) शासनाकडून जमा | | २२०.०० | ०.०० | ०.०० |
| | एकूण ब (१+२+३) | ५३०५.२४ | ८२२४.४१ | १३३१६.०० | ७२५९.०० |
| | शासनाकडून अनुदान ( अ + ब) | ७६२३१.९४ | १२०९९३.०१ | ९३७१६.९५ | १२८२२४.६६ |
| क | ई.टी.पी. शासन देय जमा रक्कम | १४०५.४९ | ८७८.६५ | १२८७.७९ | १४१६.५७ |
| ड | तांत्रिक सेवा शुल्क शासन देय जमा रक्कम | ११०३०.२८ | ११२०५.७८ | ९६५१.९५ | १०६१७.१५ |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | मजीप्राचे उत्पन्न नसलेली जमा ( क + ड ) | १२४३५.७७ | १२०८४.४३ | १०९३९.७४ | १२०३३.७२ |
| इ | मजीप्राचे उत्पन्न नसलेली एकूण जमा (अ + ब + क + ड) | ८८६६७.७१ | १३३०७७.४४ | १०४६५६.६९ | १४०२५८.३८ |
| | मजीप्राचे उत्पन्न | | | | |
| ख | इतर व्याज/PMC/PDMC | | | | |
| १ | तात्पुरत्या गुंतवणूकीवरील जमा व्याज | २८३१.८७ | २५००.०० | १३८१.०८ | १५२०.०० |
| २ अ | प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार सेवा शुल्क जमा (PMC) | ६६९.१५ | २०००.०० | ११८९.७८ | १३०८.७६ |
| २ ब | प्रकल्प विकास व व्यवस्थापन सल्लागार शुल्क जमा (PDMC) | १०००.०० | १३१७.०० | १३१७.०० | १४४८.७० |
| | एकूण ख (१+२) | ४५०१.०२ | ५८१७.०० | ३८८७.८६ | ४२७७.४६ |
| ग | पाणी विक्री, मिटर भाडे इत्यादी पासून महसूल | | | | |
| १ | पाणी पट्टी जमा (नागरी ) (विभागाप्रमाणे) | २४८३३.६८ | २८०८५.०० | २७६०७.८१ | ३०३६८.५९ |
| २ | पाणी विक्री वरील जमा विलंब आकार | ३०१.४६ | १८०.०० | ७२.१६ | ७९.३८ |
| ३ | पाणी पट्टी जमा (ग्रामीण) (विभागाप्रमाणे) | ४९१४.६८ | ५४०५.०० | ३०३५.४४ | ३३३८.९८ |
| ४ | देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन जमा अनुदान | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | एकुण ग ( १+२+३+४) | ३००४९.८२ | ३३६७०.०० | ३०७१५.४१ | ३३७८६.९५ |
| च | इतर जमा | | | | |
| १ | निविदा विक्री/दंड जमा | १५५.४१ | १७०.०० | १३०.७९ | १४३.८७ |
| २ | इमारतीचे भाडे जमा | ३८७.०३ | ४००.०७ | ३९८.२६ | ४३८.०९ |
| ३ | भंगार विक्री जमा | १२०.२३ | १३०.०० | २०.४७ | २२.५२ |
| ४ | आस्थापना विषयक वसूली (१.१७) जमा | ३.८१ | ११.०० | १०.९० | ११.९९ |
| ५ | वरकड जमा ( लेखाशिर्ष १.१८) जमा | १३४.६८ | २३७.७९ | ५२.३८ | ५७.६२ |
| ६ | निवासी वसाहतीना लागणारे भांडवली जमा अंशदान | २९६.६० | ५५०.०० | ४११.१९ | ४५२.३१ |
| ७ | जलस्वराज्य टप्पा-२ (लेखाशिर्ष) (प्रशासकीय खर्चासाठी जमा रक्कम ) | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ८ | प्रतिनियुक्ती निवृत्ती वेतन व रजा वेतन अंशदान जमा रक्कम | २५.९७ | ४१.५० | ७२.५८ | ७९.८४ |
| | एकूण च ( १ ते ८) | ११२३.७३ | १५४०.३६ | १०९६.५७ | १२०६.२३ |
| छ | प्रकल्प कर्जावरील व्याज महानगरपालिका/ नगरपालिका यांना दिलेल्या कर्जावरील व्याज(आयुर्विमा कर्ज,खू.बा.कर्ज, हुडको कर्ज,वरील व्याज) जमा | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | एकूण (छ) | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ज | मजीप्राचे एकुण उत्पन्न (ख+ग+च+छ) | ३५६७४.५७ | ४१०२७.३६ | ३५६९९.८४ | ३९२७०.६४ |
| | एकूण जमा (इ+ज) | १२४३४२.२८ | १७४१०४.८० | १४०३५६.५३ | १७९५२९.०२ |

विवरणपत्र क्रमांक २

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

आर्थिक वर्ष २०२५-२६ चे सुधारित व आर्थिक वर्ष २०२६-२७ चे मूळ अंदाज ( महसूली खर्चाचा तपशील )

( रुपये लाखात )

| | | लेखा शिर्ष | २०२४-२५ | २०२५-२६ | | २०२६-२७ |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र | तपशील | | प्रत्यक्ष खर्च | मूळ तरतूद | निधीच्या उपलब्धतेनुसार सुधारित तरतूद (अंदाजित) | निधीच्या उपलब्धतेनुसार मूळ तरतूद (अंदाजित) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| (अ -१) वेतन,भत्ते व निवृत्ती वेतन लाभ खर्च | | | | | | |
| i | म.जी.प्रा.च्या कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्यासाठी खर्च व प्रतिपूर्ती रकमेच्या समायोजनासह २२१५A०४१ | २.११ | १६४३३.४३ | २७८१४.६० | २७७६४.०० | ३०३११.१८ |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ii | म.जी.प्रा.च्या निवृत्ती वेतनासाठी खर्च व प्रतिपूर्ती रकमेच्या समायोजनासह २२१५A०५२ | १८.१२ | ५४४९७.७६ | ८४९५४.०० | ५२६३६.९५ | ९०६५४.४८ |
| | एकूण (i + ii) | | ७०९३१.१९ | ११२७६८.६० | ८०४००.९५ | १२०९६५.६६ |
| (अ -२) | शासनाकडून अन्य अनुदान | | | | | |
| i | म. जी. प्रा. कर्मचा-यांच्या भ.नि.नि.वरील व्याज प्रदाने | २०४९१२६८ | २८५०.०० | ३१३५.०० | २७९६.०० | २९७९.०० |
| ii | शासनाकडे खर्च करण्यात आलेली महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचा-याचा भ.नि.नि.खर्च | ८३३६००७४ | २५००.०० | ५०००.०० | १०५२०.०० | ४२८०.०० |
| iii | प्रशिक्षणासाठी (मजीप्रा विभाग नाशिकमित्रा) खर्च | | ९४.३८ | २२०.०० | ०.०० | ०.०० |
| | एकूण (अ १ + २) | | ७६३७५.५७ | १२११२३.६० | ९३७१६.९५ | १२८२२४.६६ |
| अ-3 | ई.टी.पी. शासनास देय रक्कम | २१५१२८ | १४०५.४९ | ८७८.६५ | १२८७.७९ | १४१६.५७ |
| अ-4 | तांत्रिक सेवा शुल्क शासनास देय रक्कम | २१५१२८ | ११०३०.२७ | ११२०५.७८ | ९६५१.९५ | १०६१७.१५ |
| | मजीप्राचे दायित्व नसलेला खर्च (अ ३ + ४ ) | | १२४३५.७६ | १२०८४.४३ | १०९३९.७४ | १२०३३.७२ |
| अ | मजीप्राचे दायित्व नसलेला एकूण खर्च (१ + २ + ३ + ४) | | ८८८११.३३ | १३३२०८.०३ | १०४६५६.६९ | १४०२५८.३८ |
| (ब) प्रशासकीय खर्च- मजीप्रा | | | | | | |
| ब-१] १ | रुपांतरित आस्थापनेचे व नियमित वेतन व भत्ते (मजीप्रा दायित्व) | २.४१ | १२४९.३४ | २४००.०० | २०००.०० | २२००.०० |
| २ | रुपांतरित आस्थापना ७ वा वेतन आयोग (थकबाकी) खर्च दि.०१.०४.२०१७ ते दि.३०.०९.२०२१ पर्यंत | २.४१ | ०.०० | ८८०.०० | १४००.०० | १४००.०० |
| | एकुण (ब-१) | | १२४९.३४ | ३२८०.०० | ३४००.०० | ३६००.०० |
| ब-२] १ | प्रवास खर्च | २.१२ | १३९.६६ | १९५.१३ | ११५.०० | १२६.५० |
| २ | वैद्यकीय खर्च | २.१३ | ८९.४१ | २३४.३५ | १०५.०० | ११५.५० |
| ३ | गणवेश व वर्दी खर्च | २.१४ | ८.७० | ९.७९ | २.९८ | ३.२८ |
| ४ | प्रशिक्षण खर्च (अ)संगणक प्रशिक्षण | २.१५ | ०.८९ | ११.०० | ०.१२ | ०.१३ |
| ५ | निवृत्ती वेतन व रजा वेतन अंशदान खर्च | २.१६ व २.१८ | ९१.७७ | ५१.५० | ६२.९४ | ६९.२४ |
| ६ | मुद्रण व लेखन सामुग्री खर्च | २.२०१ | ९१.७९ | १६९.२४ | १२५.०० | १३७.५० |
| ७ | जाहिरात व प्रसिध्दी खर्च | २.२०२ | ६४.७० | ८३.२१ | ४०.०० | ४४.०० |
| ८ | टपाल / दुरध्वनी खर्च/ इतर खर्च | २.२०३ | ३१.८९ | ५९.१३ | ३२.०० | ३५.२० |
| ९ | पुस्तके व नियतकालिके खर्च | २.२०५ | ०.३० | २.२० | ०.०५ | ०.०६ |
| १० | वीज व पाणी खर्च | २.२०६ | १२०.४७ | १८०.०० | १००.०० | ११०.०० |
| ११ | भाडेपट्टी व कर खर्च | २.२०७ | २३२.५२ | ४२६.०० | १४०.०० | १५४.०० |
| १२ | लेखापरीक्षण व शुल्क खर्च | २.२०८ | ०.२४ | १०.०० | ०.६७ | ०.७३ |
| १३ | सल्लागार सेवा खर्च | २.२१० | १२२.८३ | ५२३.३४ | १८६.१७ | २०४.७९ |
| १४ | बँक व खर्च | २.२१२ | १३.४० | ४.३५ | १२.२८ | १३.५१ |
| १५ | किरकोळ खर्च (कार्यालयीन खर्च झेरॉक्स इ.) | २.२१३ | ५७०.२२ | २३४.०० | २४४.४४ | २६८.८९ |
| १६ | कायदेविषयक शुल्क खर्च | २.२३० | १३५.३७ | ८२.०० | १०६.६७ | ११७.३३ |
| १७ | संगणक देखभाल दुरुस्ती खर्च | २.२१४ | ४४.४२ | ११९.८२ | ६५.०० | १४४.७५ |
| १८ | कंत्राटी कामगार (म.जी.प्रा.) खर्च | २.११० | ५०४.९५ | १०७५.९६ | ११९२.२० | १४००.०० |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण (ब-२) | | २२६३.५३ | ३४७१.०२ | २५३०.५३ | २९४५.४१ |
| | एकूण ( ब-१ + ब-२) | | ३५१२.८७ | ६७५१.०२ | ५९३०.५३ | ६५४५.४१ |
| (क)वाहन, इमारत इ देखभाल दुरुस्ती खर्च | | | | | | |
| १ | वाहन देखभाल दुरुस्ती खर्च | २.३ | ६७.४२ | १२९.५० | ५०.०० | १००.०० |
| २ | वाहन भाडे खर्च | २.५१ | २८८.०७ | ७०४.७९ | ४००.०० | ७००.०० |
| ३ | इमारत, हत्यारे, सयंत्र देखभाल दुरुस्ती खर्च | २.५२ व २.५४ | ७२२.१५ | ११७४.१२ | ७२०.०० | ९००.०० |
| ४ | मालमत्तेवरील घसारा आकार खर्च | १६.४४ | २७६.९८ | ८४५.१३ | ०.०० | ०.०० |
| | एकूण (क) | | १३५४.६२ | २८५३.५४ | ११७०.०० | १७००.०० |
| ड | इतर खर्च | | | | | |
| १ | संगणक प्रणाली विकसीत व अंमलबजावणी | २.२५१ | २५६.९६ | ४६७.९३ | २२१.७८ | ३२८.८२ |
| २ | अपंग व्यक्तींना वाहन खरेदीसाठी अनुदान | २.२१५ | ०.०० | ०.५४ | ०.०० | १.०० |
| ३ | मजीप्रा वर्ग-४ कर्मचारी भ.नि.नि.व्याज | | ०.०० | १४३.२० | ०.०० | ०.०० |
| ४ | संकीर्ण खर्च (शॉप चार्जेस/परतावा/दंड/अन्य) | २.३१ | ०.०० | ०.०० | १०.०० | ११.०० |
| | एकूण (ड) | | २५६.९६ | ६११.६७ | २३१.७८ | ३४०.८२ |
| | एकूण (ब + क + ड) | | ५१२४.४५ | १०२१६.२३ | ७३३२.३१ | ८५८६.२३ |
| (इ) पाणी पुरवठा केंद्राचा खर्च | | | | | | |
| | नागरी | | | | | |
| १ | कंत्राटी सेवा खर्च | २.४१ | १७२४.७० | १८००.०० | १४६६.६७ | १५५०.०० |
| २ | विद्युत देयक खर्च | २.४२ | १०१२२.१३ | १०२२०.६६ | १०३३३.३३ | १०५५०.०० |
| ३ | रसायन खर्च | २.४३ | ४१३.०९ | ४५०.०० | ३७३.३३ | ४१०.६७ |
| ४ | रॉयल्टी खर्च | २.४४ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ५ | पाणी तपासणी खर्च | २.४७ | ८.३३ | ९.८६ | ५.२४ | ५.७७ |
| ६ | पाण्याचे पृथक्करण खर्च | २.४६ | ९८.९२ | २२.०६ | ९९.४२ | १०९.३६ |
| ७ | पाटबंधारे देयक खर्च | २.४५ | २८८४.३२ | ३१८४.०० | ३१००.०० | ३३५०.०० |
| ८ | देखभाल व दुरुस्ती ( स्थापत्य ) खर्च | २.४९ | ३९२८.८४ | ४२१२.०० | ३६००.०० | ३७५०.०० |
| ९ | देखभाल व दुरुस्ती ( यांत्रिकी ) खर्च | २.४८ | ७२८.७७ | ८००.०० | ५२०.०० | ६००.०० |
| १० | घसारा निधी | २.५६ | ३७६.४२ | ४२१.२७ | ०.०० | ०.०० |
| | एकूण | | २०२८५.५२ | २११११.८५ | १९४९७.९९ | २०३२५.७९ |
| | ग्रामीण | | | | | |
| १ | कंत्राटी सेवा खर्च | २.४२१ | २४९.०० | ३५०.०० | २२०.०० | २६४.०० |
| २ | विद्युत देयक खर्च | २.४२२ | २९८३.०३ | ३२२६.०० | ४०००.०० | ४२५२.४१ |
| ३ | रसायन खर्च | २.४२३ | १४१.७३ | १८०.०० | १४४.६४ | १६०.९२ |
| ४ | रॉयल्टी खर्च | २.४२४ | ०.०० | ११.०० | ०.०० | ०.०० |
| ५ | पाणी तपासणी खर्च | २.४२७ | ०.३९ | १.०७ | ०.०४ | ०.०४ |
| ६ | पाण्याचे पृथक्करण खर्च | २.४२६ | ०.०० | १.०० | ०.०० | ०.०० |
| ७ | पाटबंधारे देयक खर्च | २.४२५ | ४१७.९७ | ६४७.१२ | ६५०.०० | ७००.०० |
| ८ | देखभाल व दुरुस्ती ( स्थापत्य ) खर्च | २.४२९ | २२८०.९७ | २८००.०० | २७००.०० | २९००.०० |
| ९ | देखभाल व दुरुस्ती ( यांत्रिकी ) खर्च | २.४२८ | ५३२.३८ | ४१३.१० | १२१.५० | १४३.६५ |
| १० | घसारा निधी | २.५६० | १८.४७ | ११०.०० | ०.०० | ०.०० |
| | एकूण | | ६६२३.९४ | ७७३९.२९ | ७८३६.१८ | ८४२१.०२ |
| | एकूण (इ) | | २६९०९.४६ | २८८५१.१४ | २७३३४.१७ | २८७४६.८१ |
| (ई) | आयु.महा.मंडळ/खुल्या बाजारातील /हुडको/त्रुटी कर्जावरील | | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | व्याज/प्रकल्प कर्ज परतफेड | | | | | |
| | एकूण (ई) | | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| मजीप्रा खर्च एकूण ( ब+ क + ड + इ + ई) | | | ३२०३३.९१ | ३९०७५.३७ | ३४६६६.४८ | ३७३३३.०४ |
| एकूण खर्च (अ + ब + क + ड + इ + ई ) | | | १२०८४५.२४ | १७२२८३.४० | १३९३२३.१७ | १७७५९१.४२ |

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

विवरणपत्र क्रमांक ३

आर्थिक वर्ष २०२५-२६ चे सुधारित व आर्थिक वर्ष २०२६-२७ चे मूळ भांडवली जमेचे अंदाज (रू. लाखात )

| | भांडवली जमेचे तपशील | लेखा शिर्ष क्रमांक | २०२४-२५ प्रत्यक्ष जमा | २०२५-२६ मूळ अंदाज | २०२५-२६ सुधारीत तरतूद (अंदाजित) | २०२६-२७ मूळ तरतूद (अंदाजित) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| अ | महसुली वर्ताळा Revenue Surplus) | | २५०३.३२ | १९५१.९९ | १०३३.३६ | १९३७.६० |
| ब | शासन अनुदान | | | | | |
| १ | न्यायालयीन प्रकरणी भूसंपादन मोबदला जमा अनुदान (निलडोह-डिगडोह/चापडोह/अन्य) | २२१५८९७३ | ०.०० | १५९४.०५ | १४६.१० | ३४८७.७५ |
| २ | तिल्लारी प्रकल्पाच्या आधारित पापुयो.जमा | २२१५A०३२ | ०.०० | ९१४७.१२ | ९१३१.९३ | ०.०० |
| ३ | ग्रामीण भागातील सांडपाणी व्यवस्थापनासाठी नाबार्ड कर्ज.जमा | २२१५९८७१ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ४ | मुख्यमंत्री पेयजल कार्यक्रम (सर्व साधारण घटक राज्य हिस्सा) फुरसुंगी पाणी पुरवठा योजना जमा अनुदान | २२१५९९४२ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ५ | Water Gems & Sever Gems करीता Upgrade करणेबाबत | ३४५१२७६४ | ०.०० | ०.०० | ०.०० | १०७०.०० |
| ६ | जलस्वराज्य टप्पा-२ जमा अनुदान (JJM अंतर्गत येणारे प्रयोगशाळा अनुदान सह अन्य) | २२१५९३०७ | २८७.६७ | १५३०.०० | १२४६.०० | ३०.०० |
| ७ | मराठवाडा ग्रीड योजना जमा | २२१५A०२३ | ०.०० | ५००.०० | २०००.०० | ५०००.०० |
| ८ | नागरी व ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचे टंचाई निवारणार्थ जमा अनुदान | २२१५A१९५ | ०.०० | ०.०० | ६००.२८ | ६६०.३० |
| ९ | मजीप्रा पा.पु.यो. Imple.of E-Gover. Project | ३४५१२७६४ | ०.०० | ०.०० | ०.०० | ४९५.०० |
| | एकूण ब | | २८७.६७ | १२७७१.१७ | १३१२४.३१ | १०७४३.०५ |
| | एकूण ( अ + ब) | | २७९०.९९ | १४७२३.१६ | १३१२४.३१ | १०७४३.०५ |
| क | कर्ज - नागरी व ग्रामीण परतफेड करीता अनुदान | | | | | |
| १ | आयुर्विमा कर्ज परतफेड करीता नागरी जमा अनुदान | ६२१५००९४ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| २ | आयुर्विमा कर्ज परतफेड करीता ग्रामीण जमा अनुदान | २२१५११७३ | ७१७.७८ | ६२२.३१ | ६२२.३१ | ४७९.१० |
| ३ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला भाग भांडवली अंशदान योजनेत्तर जमा | ४२१५०१२५ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ४ | हुडको कर्ज | | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | एकूण क | | ७१७.७८ | ६२२.३१ | ६२२.३१ | ४७९.१० |
| ड | नगरपालिकांकडून कर्ज वसूली | | | | | |
| १ | आयुर्विमा कर्ज वसूली | | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| २ | शासकीय कर्ज वसूली | | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ३ | खुल्या बाजारातील कर्ज वसूली | | ०.३० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ४ | प्रकल्प कर्ज वसूली | | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ५ | हुडको कर्ज वसूली | | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | | ०.३० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ६ | हमी शुल्काची वसूली | | ७.५३ | ५२९२.४७ | २२.८९ | ०.०० |
| | एकूण ड | | ७.८३ | ५२९२.४७ | २२.८९ | ०.०० |
| इ | राखीव निधी | | | | | |
| १ | घसारा निधीतून मजीप्राचा हिस्सा वर्ग | | १५२३.४५ | १८३५१.०० | १०८३२.०९ | ११९१५.३० |
| २ | घसारा निधीवरील जमा व्याज | | ७९००.२० | ८०००.०० | ८०००.०० | ८०००.०० |
| ३ | सॉफ्टवेअर विकासित करण्यासाठी घसारा जमा रकमेतून उचल | | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | एकूण इ | | ९४२३.६५ | २६३५१.०० | १८८३२.०९ | १९९१५.३० |
| ई | पूर्ण ठेव योजना | | | | | |
| १ | पूर्ण ठेव योजना जमा रकमेतून वर्ग (अमृत व नगरोत्थान योजनासह) | | २७६७२.८७ | ४००००.०० | २१८२२.८१ | २४०००.०० |
| | एकूण ई | | २७६७२.८७ | ४००००.०० | २१८२२.८१ | २४०००.०० |
| | एकूण (अ+ब+क+ड+इ+ई) | | ४०६१३.१२ | ८६९८८.९४ | ५४४२४.४१ | ५५१३७.४५ |

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

विवरणपत्र क्रमांक ४

आर्थिक वर्ष २०२५-२६ चे सुधारित व आर्थिक वर्ष २०२६-२७ चे मूळ भांडवली खर्चाचे अंदाज

(रू. लाखात )

| | | | २०२४-२५ | २०२५-२६ | | २०२६-२७ |
|---|---|---|---|---|---|---|
| | भांडवली खर्चाचे तपशील | लेखाशिर्ष क्रमांक | प्रत्यक्ष खर्च | अर्थसंकल्पीय मूळ अंदाज | सुधारीत तरतूद (अंदाजित) | मूळ तरतूद (अंदाजित) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| अ | शासन अनुदानातून खर्च | | | | | |
| १ | भूसंपादन मोबदला खर्च (निलडोह-डिगडोह/चापडोह/अन्य) | २२१५८९७३ | १७०.०७ | ११८४.७० | १४६.१० | २०००.०० |
| २ | तिल्लारी प्रकल्पाच्या आधारित पापुयो. खर्च | २२१५A०३२ | ०.०० | ९१४७.१२ | ९१३१.९३ | ०.०० |
| ३ | ग्रामीण भागातील सांडपाणी व्यवस्थापनासाठी नाबार्ड कर्ज. खर्च | २२१५९८७१ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ४ | मुख्यमंत्री पेयजल कार्यक्रम (सर्व साधारण घटक राज्य हिस्सा) फुरसुंगी पाणी पुरवठा योजना खर्च | २२१५९९४२ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ५ | Water Gems & Sever Gems करीता Upgrade करणेबाबत | ३४५१२७६४ | ०.०० | ०.०० | ०.०० | १०७०.०० |
| ६ | जलस्वराज्य टप्पा-२ अनुदानातुन खर्च (JJM अंतर्गत येणारे प्रयोगशाळा अनुदान सह अन्य) | २२१५९३०७ | १८२.२६ | १५३०.०० | १२४६.०० | ३०.०० |
| ७ | मराठवाडा ग्रीड योजना खर्च | २२१५A०२३ | ०.०० | ५००.०० | २०००.०० | ५०००.०० |
| ८ | नागरी व ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचे टंचाई निवारणार्थ खर्च | २२१५A१९५ | ०.०० | ०.०० | ६००.२८ | ६६०.३० |
| ९ | मजीप्रा पा.पु.यो. Imple.of E-Gover. Project | ३४५१२७६४ | ०.०० | ०.०० | ०.०० | ४९५.०० |
| | एकूण अ | | ३५२.३३ | १२३६१.८२ | १३१२४.३१ | ९२५५.३० |
| ब | कर्ज - नागरी व ग्रामीण परतफेड | | | | | |
| १ | आयुर्विमा कर्ज परतफेड नागरी | ६२१५००९४ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| २ | आयुर्विमा कर्ज परतफेड ग्रामीण | २२१५११७३ | ७१७.७८ | ६२२.३१ | ६२२.३१ | ४७९.१० |
| ३ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला भाग भांडवली अंशदान योजनेत्तर खर्च | ४२१५०१२५ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ४ | हुडको कर्ज परतफेड | | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | एकूण ब | | ७१७.७८ | ६२२.३१ | ६२२.३१ | ४७९.१० |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| क | कर्ज परतफेड | | | | | |
| १ | आयुर्विमा कर्ज परतफेड | | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| २ | शासकीय कर्ज परतफेड | | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ३ | खुल्या बाजारातील कर्ज परतफेड | | ०.३० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ४ | प्रकल्प कर्ज परतफेड | | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ५ | हुडको कर्ज परतफेड | | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | एकूण | | ०.३० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ६ | हमी शुल्काची परतफेड | | ७.५३ | ५२९२.४७ | २२.८९ | ०.०० |
| | एकूण क | | ७.८३ | ५२९२.४७ | २२.८९ | ०.०० |
| ड | राखीव निधी | | | | | |
| १ | घसारा निधीतून मजीप्राचा हिश्याचा खर्च | | २३२२.०५ | १८३५१.०० | १०८३२.०९ | ११९१५.३० |
| २ | घसारा निधी व्याज घसारा निधीत जमा करणे | | ७९००.२० | ८०००.०० | ८०००.०० | ८०००.०० |
| ३ | सॉप्टवेअर विकासित करण्यासाठी घसारा निधीतुन खर्च | | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | एकूण ड | | १०२२२.२५ | २६३५१.०० | १८८३२.०९ | १९९१५.३० |
| इ | पूर्ण ठेव योजना | | | | | |
| १ | पूर्ण ठेव योजना (अमृत व नगरोत्थान योजनासह) | १२.२९ | २७६७२.८७ | ४००००.०० | २१८२२.८१ | २४०००.०० |
| | एकूण इ | | २७६७२.८७ | ४००००.०० | २१८२२.८१ | २४०००.०० |
| ई | मजीप्राचा स्वनिधीतून खर्च | | | | | |
| १ | नविन वाहन खरेदी खर्च | १२.१८ | २७.१२ | ०.०० | ०.०० | ०.०० |
| २ | इलेक्ट्रॉनिक्स व उपकरणे खर्च | १२.१७६ | ०.१० | ६.३० | १३.३६ | १२.८४ |
| ३ | नवीन फर्निचर खरेदी खर्च | १२.१६ | ०.५० | ८०.०० | ३०.०० | ७४.७६ |
| ४ | नवीन संगणक खरेदी खर्च | १२.१७७ | १५.८२ | १८२.०४ | ४०.०० | १००.०० |
| ५ | नविन इमारत बांधकाम खर्च | १२.१५ | ७१.५६ | ५०.६५ | ०.०० | ५०.०० |
| ६ | संचाले मंडळाच्या मान्यतेने मजीप्रा हिस्सा खर्च (स्वनिधीतून)(जालना १७३ गावे व ९५ गावे सह अन्य) | २.४११ | ४१.०३ | १६३३.०० | ९५०.०० | १७००.०० |
| | एकूण ई | | १५६.१३ | १९५१.९९ | १०३३.३६ | १९३७.६० |
| | एकूण (अ+ब+क+ड+इ+ई) | | ३९१२९.१९ | ८६५७९.५९ | ५५४५७.७७ | ५५५८७.३० |

MAHARASHTRA JEEVAN PRADHIKARAN] NAVI MUMBAI

ETP INFORMATION FOR THE YEAR 2025-2026

| SR. NO. | MONTH/ YEAR | TOKAN NO. | DATE | ETP | TOKAN NO. | DATE | TECH. CHARGES |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | | | 3 | | | 4 |
| 1 | Mar-25 | 1532 | 24.04.2025 | 7992809.00 | 1533 | 24.04.2025 | 139611835.00 |
| 2 | Apr-25 | 4039 | 02.06.2025 | 10811474.00 | 4040 | 02.06.2025 | 60223622.00 |
| 3 | May-25 | 4952 | 13.06.2025 | 1474554.00 | 4953 | 13.06.2025 | 46590040.00 |
| 4 | Jun-25 | 7019 | 16.07.2025 | 10780674.00 | 7018 | 16.07.2025 | 75479213.00 |
| 5 | Jul-25 | 9022 | 25.08.2025 | 13942389.00 | 9021 | 25.08.2025 | 62826440.00 |
| 6 | Aug-25 | 11242 | 03.10.2025 | 20751325.00 | 11241 | 03.10.2025 | 73787876.00 |
| 7 | Sep-25 | 13137 | 4.11.2025 | 16716923.00 | 13138 | 4.11.2025 | 347430840.00 |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | oct-205 | 15221 | 2.12.2025 | 14511830.00 | 15220 | 2.12.2025 | 77746016.00 |
| 9 | Nov-25 | 25592 | 2.01.2026 | 10437074.00 | 25591 | 2.01.2026 | 3207464.00 |
| | TOTAL | | | 107419052.00 | | | 886903346.00 |

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की,

**आर्थिक वर्ष २०२४-२५ चे सुधारित व आर्थिक वर्ष २०२५-२६ चे जमा खर्चाचे मूळ अंदाज**

१. कार्यक्रम बाब क्रमांक ०९ दिनांक ११.०३.२०२६ अन्वये विवरणपत्र १, २, ३ व ४ प्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे आर्थिक वर्ष २०२४-२५ चे सुधारित व आर्थिक वर्ष २०२५-२६ चे जमा खर्चाचे मूळ अंदाज मान्य करण्यात येत आहेत.

| गोषवारा (रक्कम रु.लाखात) | | |
|---|---|---|
| तपशील | सुधारित अंदाज वित्तीय वर्ष २०२४-२५ | अर्थसंकल्पिय अंदाज वित्तीय वर्ष २०२५-२६ |
| १ | २ | ३ |
| महसुली जमा | १२४१५२.६६ | १७४१०४.८० |
| भांडवली जमा | ४८७७६.८४ | ८६९८८.९४ |
| एकुण जमा | १७२९२९.५० | २६१०९३.७४ |
| महसुली खर्च | १२१२४१.३३ | १७२१५२.८१ |
| भांडवली खर्च | ४६०६२.२५ | ८६५७९.५९ |
| एकुण खर्च | १६७३०३.५८ | २५८७३२.४० |
| आधिक्य / तूट | + ५६२५.९२ | + २३६१.३४ |

२. मा.संचालक मंडळाने मान्यता दिल्यानुसार घसारा निधीतून/स्वनिधीतून निधी उपलब्धतेनुसार मजीप्रा हिस्सा वितरणाची कार्यवाही करण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. विभागांनी कळविलेला मालमत्तेवरील घसारा आकार तसेच पाणी पुरवठा केंद्र (नागरी व ग्रामीण) वरील घसारा आकार मध्यवर्ती कार्यालयाच्या घसारा निधीत जमा करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ठरावाच्या दिनांकापर्यंत केलेल्या निधी वितरणास व खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**आर्थिक वर्ष २०२५-२६ चे सुधारित व आर्थिक वर्ष २०२६-२७ चे जमा व खर्चाचे मूळ अंदाज**

५. विवरणपत्र १, २, ३ व ४ प्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे आर्थिक वर्ष २०२५-२६ चे सुधारित व आर्थिक वर्ष २०२६-२७ चे जमा व खर्चाचे मूळ अंदाज मान्य करण्यात येत आहेत.

| गोषवारा (रक्कम रु.कोटी) |
|---|

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| तपशील | सुधारित अंदाज वित्तीय वर्ष २०२५-२६ | अर्थसंकल्पिय अंदाज वित्तीय वर्ष २०२६-२७ |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| महसुली जमा | १४०३.५७ | १७९५.२९ |
| भांडवली जमा | ५४४.२४ | ५५१.३७ |
| एकुण जमा | १९४७.८१ | २३४६.६६ |
| महसुली खर्च | १३९३.२३ | १७७५.९१ |
| भांडवली खर्च | ५५४.५८ | ५५५.८७ |
| एकुण खर्च | १९४७.८१ | २३३१.७८ |
| आधिक्य/तूट | ०.०० | +१४.८८ |

६. वित्तीय वर्ष २०२५-२६ व वित्तीय वर्ष २०२६-२७ करीता वेतन, भत्ते व निवृत्तीवेतना करीता शासन अनुदान तसेच मजीप्राने स्वनिधीतून केलेल्या खर्चापैकी शासनाकडून अप्राप्त असलेल्या रकमा म.जी.प्रा.स उपलब्ध करुन घ्यावी.

७. वित्तीय वर्ष २०२४-२५ चे सुधारित व वित्तीय वर्ष २०२५-२६ च्या मूळ मंजूर तरतूदींचे तसेच वित्तीय वर्ष २०२५-२६ चे सुधारित व वित्तीय वर्ष २०२६-२७ च्या मूळ मंजूर तरतूदींचे सर्व विभागांना विभागनिहाय वाटप करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

८. मा.संचालक मंडळाने बाबनिहाय मान्य केलेल्या तरतूदींच्या मर्यादेत आवश्यकतेनुसार पुनर्विनियोजन करून वाटप करण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१० :-** सन २०२२-२३ चा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा वार्षिक लेख्यास संचालक मंडळाची मान्यता घेणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संचालक मंडळाची १५९वी बैठक दि.११.०३.२०२६ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत प्राधिकरणाचे सन २०२२-२३ या वर्षाचे वार्षिक लेखे संचालक मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर करण्यात आले. वार्षिक लेख्याबाबतची सविस्तर माहिती संचालक मंडळास देण्यात आली. चर्चेअंती सन २०२२-२३ च्या वार्षिक लेख्यास, कार्यक्रम बाब क्र.१० अन्वये संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली. खालील प्रमाणे ठराव पारित केला.

**ठराव:**

१) असा ठराव करण्यात येतो की, सन २०२२-२३ या वर्षाचे वार्षिक लेखे स्विकृत करण्यात आले आहेत.

२) असाही ठराव करण्यात येतो की, सन २०२२-२३ या वर्षाचे वार्षिक लेखे प्राधिकरणाच्या वतीने प्राधिकरणाचे मा.अध्यक्ष व सदस्य सचिव, यांनी प्रमाणित करावेत.

३) वित्तीय वर्ष २०२२-२३ च्या लेख्यामध्ये मोठ्या प्रमाणावर प्रलंबित दिसत असलेल्या MPWA रकमेबाबत तातडीने ताळमेळ घेण्याची कार्यवाही करावी. तसेच असाही ठराव करण्यात येतो की, सदर लेख्यावर उपस्थित केलेल्या आक्षेप/शिफारशींचे अनुपालन त्वरीत करावे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

४) आर्थिक वर्ष २०२३-२४ पासूनचे लेखे तयार करुन त्वरीत मा.संचालक मंडळासमोर सादर करण्याच्या सुचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या.

५) स्वीकृत लेखा महालेखापाल नागपूर, यांना लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन देणे, इत्यादीसाठी सदस्य सचिव, यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.११ :-** पुर्ण ठेव तत्वावर पाणी पुरवठा व मलनि:सारण विषयक कामे स्विकारण्यापुर्वी मध्यवर्ती कार्यालयाची पुर्वपरवानगी घेणेबाबत.

**संदर्भ:**
१. मजीप्रा मध्यवर्ती कार्यालयाचे पत्र क्र. मजीप्रा/सस/तांशा-१/९४९,दि.०२.०८.२०१६
२. मजीप्रा मध्यवर्ती कार्यालयाचे पत्र क्र. मजीप्रा/सस/तांशा-१/१३२२, दि.२३.११.२०१६

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कायदा -१९७६ मध्ये निहित करण्यात आलेल्या मजीप्राच्या कर्तव्यांमध्ये राज्य व केंद्र शासनाव्यतिरिक्त इतर संस्था/ व्यक्ती यांनी विनंती केल्यास, पाणी पुरवठा व स्वच्छता योजनांची अंमलबजावणी करणे या बाबींचा समावेश आहे. यामध्ये मुख्यत: पूर्ण ठेव तत्वावरील कामे आणि प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा या बाबींचा समावेश होतो. पूर्ण ठेव तत्वावरील कामे करताना त्यामध्ये प्राथमिक सर्वेक्षण ते प्रकल्पांची अंमलबजावणी पूर्ण करणे या बाबींचा समावेश होतो. काही वेळा नगरपालिका/महानगरपालिका यांसारख्या संस्था मजीप्राकडून फक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा घेतात. काही वेळा स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत सुरु करण्यात आलेली कामे अर्धवट स्वरुपात असताना, अंमलबजावणीसाठी मजीप्राकडे हस्तांतरीत करण्यात येतात.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विविध कामांसंबंधी वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांचेमार्फत निर्धारित करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार पूर्ण ठेव तत्वावर कामे स्वीकारण्याचे संपूर्ण अधिकार मुख्य अभियंता यांना देण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने मजीप्रा मध्यवर्ती कार्यालयाच्या संदर्भिय पत्र क्र.१ व २ अन्वये, इतर यंत्रणांची पाणी पुरवठा व जलनि:सारण विषयक कामे स्वीकारण्याचे अधिकार संबंधित मुख्य अभियंता, मजीप्रा यांना देण्यात आलेले आहेत व ही कामे वगळता इतर प्रकारची रु.२५ लक्ष पेक्षा जास्त किंमतीची कामे स्वीकारण्यापूर्वी सदस्य सचिव यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असल्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

सद्य:स्थितीत नगर विकास विभागामार्फत केंद्र पुरस्कृत अमृत १.० व अमृत २.० अभियान, UIDSSMT, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान इत्यादी कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा व मलनि:सारणाची कामे राबविण्यात येत असून सदर कामे तसेच इतर शासकीय / निमशासकीय विभाग, महामंडळे/ मंडळे व स्वायत्त संस्था इ. यांचेकडून पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांची कामे पूर्ण ठेव तत्वावर अथवा प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवे अंतर्गत राबविण्याकरीता मजीप्राकडे देण्यात येत आहेत. या व्यतिरिक्त क्षेत्रीय कार्यालयांकडे इतर कामे जसे जिल्हा नियोजन व विकास समिती (DPDC) आमदार/खासदार निधी, टंचाई कार्यक्रम, तसेच इतर अनेक यंत्रणांमार्फत पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांची कामे पूर्ण ठेव तत्वावर अथवा प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार तत्वावर राबविण्याकरीता देण्यात येत आहेत. त्यातून मजीप्रास महसूल प्राप्त होत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

उपरोक्तनुसार इतर यंत्रणेच्या सुरु असलेल्या कामांबाबत सदर विभागांमार्फत मजीप्रास विचारणा झाल्यास त्यासंबंधीची तपशील संबंधित विभागास अथवा यंत्रणेस उपलब्ध करुन देणे शक्य होते. मात्र सद्य:स्थितीत मध्यवर्ती कार्यालयाकडे अशा प्रकारच्या कामांविषयी कोणतीही माहिती एकत्रितरित्या उपलब्ध नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या कामांमधुन मजीप्रास एका आर्थिक वर्षात किती महसूल प्राप्त होतो व सदर योजनांकरीता मजीप्राची किमी संसाधने (जसे सामग्री, मनुष्यबळ, पैसा इ.) खर्च होतात ह्याचा कोणताही ताळमेळ घेता येत नाही. त्यामुळे एकूणच अशा प्रकारच्या कामांमध्ये मध्यवर्ती कार्यालय व क्षेत्रिय कार्यालय यांच्यामध्ये कोणताही समन्वय राहत नाही.

उपरोक्त बाबींचा विचार करता नगर विकास विभागाकडील केंद्र पुरस्कृत अमृत अभियान, महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान वा इतर कोणत्याही कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा व मलनि:सारण कामे तसेच इतर शासकीय /निमशासकीय विभाग, महामंडळे/मंडळे व स्वायत्त संस्था यांचेकडून पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांची कामे (टंचाई, जिल्हा नियोजन व विकास समिती (DPDC) आमदार/खासदार निधी अंतर्गत कामे वगळून) मजीप्राकडे पूर्ण ठेव तत्वावर स्विकारण्यासाठी सदस्य सचिव, मजीप्रा यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. यास मा. संचालक मंडळाची मान्यता मिळण्याबाबत विनंती करण्यात आली.

उपरोक्त प्रमाणे चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की,

नगर विकास विभागाकडील केंद्र पुरस्कृत अमृत अभियान, महाराष्ट्र सुवर्ण जयती नगरोत्थान महाअभियान वा इतर कोणत्याही कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांची कामे तसेच इतर शासकीय /निमशासकीय विभाग, महामंडळे/मंडळे व स्वायत्त संस्था यांचेकडून पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांची कामे (टंचाई, जिल्हा नियोजन व विकास समिती (DPDC) आमदार/खासदार निधी अंतर्गत कामे वगळून) मजीप्राकडे पूर्ण ठेव तत्वावर तसेच पाणी पुरवठा योजना चालविण्याच्या प्रस्तावाची स्विकृती/अस्विकृतीबाबत सदस्य सचिव, मजीप्रा यांची पूर्व परवानगी घेण्यात यावी. याकरीता सदस्य सचिव, मजीप्रा यांच्या स्तरावरुन आवश्यक परिपत्रक निर्गमित करण्यात यावे.

याबाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव मजीप्रा यांनी प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१२ :-** **सुधारीत १७३ गावांची ग्रीड पाणी पुरवठा योजना ता.परतूर, मंठा व जालना जि.जालना** - योजनेची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करणे व देखभाल, दुरुस्तीकरिताचा खर्च म.जी.प्रा.च्या स्वनिधीतून करण्याच्या प्रस्तावास मा.संचालक मंडळाच्या मान्यतेबाबत.

**सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची मा.संचालक मंडळास अवगत केले.**

**अ) प्रस्तावना :**

१. शासन निर्णयातील अटीनुसार योजनेची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा. संचालक मंडळाच्या

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

दि.२३.०८.२०१६ रोजी झालेल्या १३७ व्या सभेमध्ये, योजनेची महाराष्ट्र शासनाच्या वतीने देखभाल व दुरुस्ती करणे, योजनेतील समाविष्ट गावांना व इतर ग्राहकांना ठोक पाणी पुरवठा करणे व पाणीपट्टीची वसूली मजीप्रामार्फत करण्यास तसेच मजीप्रामार्फत चालविण्यात येणाऱ्या इतर ग्रामीण पाणी पुरवठा योजना चालविताना आर्थिक तूट उद्भवल्यास शासनामार्फत त्याची प्रतिपूर्ती करण्यात येईल, या अटीवर १७६ गावांसाठीच्या योजनेची देखभाल व दुरुस्ती करण्यास मा. संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली आहे.

२. महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. पापुयो- २०१९/प्र. क्र.११०/पापु १८, दिनांक २८ जून, २०१९ नुसार सदर योजनेच्या रु.२४८६९.३४ लक्ष इतक्या ढोबळ किंमतीच्या अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. शासन निर्णयानुसार सदरची योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत कार्यान्वित करण्यात येईल. तसेच सदर योजनेचे कार्यान्वयन, संचलन व देखभाल दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत करण्यात येईल. योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम राहण्यासाठी पाणीपट्टी दरामध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ करण्यात यावी, असे शासन निर्णयात नमूद आहे.

३. निविदेतील अटी व शर्तीनुसार योजनेची देखभाल दुरुस्ती व योजना कंत्राटदारामार्फत चालविण्याचा ३ वर्षाचा कालावधी दि.३१.०३.२०२३ रोजी संपुष्टात आलेला आहे.

४. दि.०९.०१.२०२४ रोजी संपन्न झालेल्या मजीप्रा, मा. संचालक मंडळाच्या १५५ व्या बैठकीत सदर योजना १ वर्षाकरीता सन २०२४-२०२५ या कालावधीत देखभाल व दुरुस्तीसह चालविण्याच्या कामाच्या रु.६५५.५० लक्ष खर्चास खालील अटीच्या अधीन राहून मंजूरी प्रदान करण्यात आली होती.

१. सदर प्रशासकीय मान्यता योजना एक वर्षाच्या कालावधीकरिता चालविण्यासाठी देण्यात येत आहे. या कालावधीमध्ये योजना चालविण्याचा खर्च व पाणीपट्टी वसूली यांचा विचार करुन पुढील कालावधीचा प्रस्ताव मंजूर करण्याबाबत विचार करण्यात येईल.

२. योजनेचा देखभाल, दुरुस्ती व चालविण्याचा खर्च मंजूर किंमतीपेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घ्यावी.

३. योजनेतील समाविष्ट गावांकडून व इतर ग्राहकांकडून पाणीपट्टी वसुल करण्याची जबाबदारी क्षेत्रीय कार्यालयाची राहील. वसूलीचा नियमितपणे आढावा घेऊन वसूली व खर्चावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी मुख्य अभियंता यांची राहील.

४. योजनेची पाणीपट्टी नियमित भरणे, वसूली करणे इत्यादी विषयी आवश्यक करारनामा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषद/ ग्रामपंचायत यांच्यामध्ये करुन घेण्याची जबाबदारी मुख्य अभियंता यांची राहील.

५. योजना चालविण्याचा खर्च व पाणीपट्टी वसुली यांचा विचार करून आर्थिक तूट उद्भवल्यास तुटीची रक्कम शासनामार्फत उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने तुटीचा प्रस्ताव शासनास सादर करून त्याची प्रतिपूर्ती होणेबाबत शासनाकडे पाठपुरावा करण्याची जबाबदारी मुख्य अभियंता यांची राहील.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

६. सदर प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने शासनाच्या प्रचलित नियमानुसार कामाची निविदा प्रक्रिया राबवून पुढील कार्यवाही करावी.

**ब) मा .संचालक मंडळाच्या १५५ व्या बैठकीतील मंजूरीनुसार करण्यात आलेली कार्यवाही :**

१. सदर कार्यक्रम बाबीस मंजुरी मिळाल्यानंतर योजनेच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामाची निविदा दि.०८.०७.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. पंरतु ५ वेळेस निविदा प्रसिध्द करुनही प्रतिसाद मिळाला नसल्यामुळे स्थापत्य व यांत्रिकी कामाच्या निविदा स्वतंत्र करुन निविदा प्रसिध्द करण्यात आली. स्थापत्य कामाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी निविदा प्रसिध्द करून कार्यादेश दि.१०.०३.२०२५ रोजी मे. वसंत देशमुख, आंबाजोगाई या ठेकेदारास देण्यात आले. यांत्रिकी कामाच्या निविदेचे कार्यादेश दि.१५.०४.२०२५ रोजी मे. वसंत देशमुख, आंबाजोगाई या ठेकेदारास देण्यात आले. यादरम्यान सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात योजना ११ महिने चालविली आहे. त्यानुसार पाणीपट्टीची आकारणी रु.२६५.६१ लक्ष इतको करण्यात आली होती. त्यापैकी मजीप्रा विभाग जालना यांनी रु.३२.६९ लक्ष इतकी वसूली केली आहे.

२. पाणी घेतलेल्या प्रत्येक गावाला दर दोन महिन्याला पाणी देयके देण्यात येतात व त्यांच्याकडे पाणी देयके भरणा करण्यासाठी क्षेत्रिय कार्यालयामार्फत पाठपुरावा करण्यात येतो. गटविकास अधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडेही प्रत्येक गावाकडून पाणीपट्टी वसूली करुन देण्याबाबत कळविण्यात येते. योजनेची पाणीपट्टी नियमित भरणे, वसूली करणे इत्यादी विषयी आवश्यक करारनामा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषद/ ग्रामपंचायत यांच्यामध्ये होणे आवश्यक आहे.

३. दि.२८.०८.२०२४ ते दि.१५.०४.२०२५ या कालावधीत योजनेची देखभाल व दुरुस्ती मे. ध्रुव इंजिनिअरींग यांच्यामार्फत दरसूचीद्वारे करण्यात आली आहे. यामध्ये योजनेतील गळत्या काढणे व मनुष्यबळ पुरविण्याचे काम करुन घेण्यात आले आहे. या कालावधीतील मे. ध्रुव इंजिनिअरींग यांचे अंदाजे रु.३५ लक्ष इतक्या रक्कमेची देयके अदा करणे प्रलंबित आहे.

४. तद्नंतर योजनेचे देखभाल व दुरुस्तीचे काम मे.श्री. वसंत देशमुख, कंत्राटदार यांना स्थापत्य व यांत्रिकी कामाचे कार्यादेश अनुक्रमे दि.१५.०३.२०२५ व दि.१५.०४.२०२५ रोजी देण्यात आले होते. सदर ठेकेदाराने दि.१५.०८.२०२५ पर्यंत योजना चालविली आहे. या कालावधीतील त्यांची देयके अदा करण्यात आली नसल्याने त्यांनी काम बंद केले आहे. त्यामुळे दि. १५.०८.२०२५ पासून आजतागायत योजनेतून पाणी पुरवठा बंद आहे.

५. सदर योजनेच्या सन २०२४-२५ या वर्षाकरिता देखभाल व दुरुस्ती अंतर्गत रु.६५५.५० लक्ष खर्चास मिळालेल्या मान्यतेपैकी सद्य:स्थितीत रु.२२२.२० लक्ष इतका खर्च झालेला असून उर्वरित रु.४२२.०० लक्ष अखर्चित आहे.

सदर योजना दि.१५०८.२०२५ पर्यंत चालविण्यासाठी झालेल्या खर्चाची पुढीलप्रमाणे देयके अदा करणे प्रलंबित आहेत.

| **अ.क्र.** | **तपशील** | **प्रलंबित देयके** |
|---|---|---|
| १. | माहे ऑगस्ट २०२५ पर्यंत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे देयक | रु.१५२ लक्ष |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | |
|---|---|---|
| २. | पाटबंधारे खात्याचे पाणी आरक्षणाचे देयक | रु.६६ लक्ष |
| ३. | देखभाल व दुरुस्तीचे मे. ध्रुव इंजिनिअरींग यांचे देयक | रु.३५ लक्ष |
| ४. | देखभाल व दुरुस्ती कंत्राटदार मे. वसंत देशमुख, आंबाजोगाई यांचे देयक | रु.१८० लक्ष |
| ५. | रसायने व इतर खर्च | रु.१५ लक्ष |
| | **एकूण** | **रु.४४८ लक्ष** |

सदर रु.४८८ लक्ष खर्च हा सन २०२३-२४ च्या मंजूर अंदाजपत्रकातील अखर्चित रु.४२२ लक्ष या रक्कमेमधून करणे शक्य आहे.

**क) सन २०२५-२६ देखभाल व दुरुस्ती अंदाजपत्रकाचा तपशील :**

मुख्य अभियंता यांनी दि.०३.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी योजनेची देखभाल, दुरुस्ती व योजना चालविण्याच्या कामाचे रु.९,८८,१८,३७७/- इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास अटी व शर्तीच्या अधिन राहून मुख्य अभियंता यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे व सदर अंदाजपत्रक मजीप्रा संचालक मंडळाच्या बैठकीच्या मान्यतेसाठी कार्यक्रम बाबीद्वारे सादर केले आहे.

सदर अंदाजपत्रकाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

१. प्रस्तावामध्ये मूळ मंजूर प्रशासकीय मान्यतेनुसार १७६ गावे व सुधारित मंजूरीनुसार १७३ गावांची यादी संलग्न केली आहे.

२. १७३ गावांच्या सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार पाणी पुरवठा सुरु असलेली गावे-९७, पाणी पुरवठा सुरु नसलेली गावे-२० व पाणी घेत नसलेलो गावे-५६ यांची यादी प्रस्तावात संलग्न केली आहे.

पाणी पुरवठा सुरु नसलेली गावे- २० चा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | १२० गावे योजनेत समाविष्ट असलेली गावे | ९ गावे |
| २ | राष्ट्रीय महामार्गामुळे पाईपलाईनची तोडफोड झालेली गावे | ८ गावे |
| ३ | ग्रामपंचायतीने काम करु न दिलेली गावे | २ गावे |
| ४ | तांत्रिक कारणामुळे पाणी पोहचू न शकलेली गावे | १ गाव |

योजनेद्वारे पाणीपुरवठा सुरु ठेवण्यासाठी सन २०२५-२६ च्या उर्वरित शिल्लक कालावधीसह, १२ महिन्यासाठी देखभाल व दुरुस्तीसह योजना चालविण्याच्या रु.९८८.१८ लक्ष इतक्या अंदाजित खर्चाचे अंदाजपत्रक दर प्रति १००० लि. करीता रु.१४.४६ पाणीदर मान्यतेसाठी मुख्य अभियंता यांनी सादर केले आहे.

**ड) देखभाल-दुरुस्ती खर्च व अपेक्षित पाणीपट्टी वसूलीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.**

| सन | पाण्याची मागणी | देखभाल दुरुस्ती खर्च | पाणीपट्टी वसुली | दर प्रति १००० लि. |
|---|---|---|---|---|
| २०२५-२६ | २४.४७ दललली/दिन | रु.९८८.१८ लक्ष | रु.१०५२.७२ लक्ष | रु.१४.४६ |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**इ) प्रस्ताव व कार्यक्रम बाब सादर करण्याची आवश्यकता :**
सुधारीत योजनेच्या शासन निर्णयातील अट क्र.२ अन्वये सदर योजनेचे कार्यान्वयन, संचलन व देखभाल दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत करण्यात येईल असे नमुद असल्यामुळे सदर योजनेची देखभाल-दुरुस्ती व पाणीपट्टीची वसूली मजीप्रामार्फत करण्याविषयीचा प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता आहे.

**ई)** सदर योजने संदर्भात सन २०२५ च्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात मा. विधानसभा सदस्य, जालना, परतुर व मंठा विधानसभा मतदारसंघ श्री.बबनरावजी दतात्रय यादव (लोणीकर) यांनी नियम १०५ अन्वये लक्षवेधी सुचना क्र.१११५ द्वारे सदर योजनेची कामे अपूर्ण असणे, योजनेमध्ये समाविष्ट गावांना पाणी पोहचले नसणे इत्यादीबाबत लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. सदर लक्षवेधी सूचनेचे निवेदन सादर करताना १७३ गावे ग्रीड पध्दतीच्या पाणी पुरवठा योजनेत समाविष्ट सर्व गावांना त्वरीत पाणी पुरवठा सुरु करण्यात येईल असे आश्वासन मा. मंत्री महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता यांनी दिले आहेत. त्यामुळे सदर योजनेमधुन पाणी पुरवठा सुरु करणे आवश्यक आहे.

**उ)** १७३ गावे ग्रीड पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती करण्याच्या रु.९८८.१८ लक्ष इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास मा.मंत्री महोदय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सदर निधी मजीप्राच्या स्वनिधीतून उभारण्यास मा.संचालक मंडळाची मान्यता घेण्याच्या अटीवर प्रस्तावास मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त नमूद वस्तु:स्थितीनुसार १७३ गावे ग्रीड पाणी पुरवठा योजना ता. परतूर, मंठा व जालना, जि.जालना योजनेची देखभाल व दुरुस्ती करण्याच्या रु.९८८.१८ लक्ष इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत मा. संचालक मंडळास विनंती करण्यात येत आहे.

**ऊ)** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना अंतर्गत १७३ गांवे ग्रीड पाणी पुरवठा योजनेच्या सन २०२५-२०२६ या उर्वरित कालावधीसह एक वर्षाच्या देखभाल व दुरुस्तीकरिता लागणाऱ्या रु.९८८.१८ लक्ष खर्चाच्या अंदाजपत्रकास खालील अटींच्या अधिन राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदरचा खर्च प्राधिकरणाच्या स्वनिधीतून करण्यास खालील अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

**अटी :**

१. सदर ठरावान्वये योजना चालविण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे. योजना चालविण्याचा खर्च व पाणीपट्टी वसूली यांचा वेळोवेळी आढावा घेऊन समतोल राखण्याची जबाबदारी क्षेत्रिय कार्यालयाची राहील.

२. सदर योजना चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणे, वसूली व खर्च याचा समतोल राखणे इत्यादी कामाकरिता नियमित इंजिनियर इनचार्ज (Engineer In Charge) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, जालना, हे राहतील व याबाबतची सर्वस्वी जबाबदारी इंजिनियर इनचार्ज म्हणून कार्यकारी अभियंता यांची राहील.

३. योजना चालविण्याचा व देखभाल दुरुस्तीचा खर्च मंजूर अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घ्यावी.

४. योजनेतील समाविष्ट गावांकडून व इतर ग्राहकांकडून पाणीपट्टीची वसूली करण्याची

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

जबाबदारी क्षेत्रिय कार्यालयाची राहील. वसूलीबाबतचा नियमितपणे आढावा घेऊन वसूली व खर्च याचा समतोल राखणे व यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी मुख्य अभियंता यांची राहील.

५. मजीप्राने अंतिम केलेल्या दरानुसार योजनेत समाविष्ट गावांना ठोक पाणीपुरवठा करण्यात येईल व ज्या ग्रामपंचायतीचे देयक ३ महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी प्रलंबित राहिल त्या ग्रामपंचायतीचा पाणी पुरवठा खंडित करण्यात येईल.

वरील प्रस्तावाबाबत मा.संचालक मंडळाच्या बैठकीत चर्चा होऊन पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

१. सदर योजनेस पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दि.२८.०६.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर शासन निर्णयामधील अट क्र.२ नुसार सदर योजनेचे संचलन व देखभाल दुरुस्ती मजीप्रामार्फत करावयाची आहे. याअनुषंगाने सदर योजनेची देखभाल व दुरुस्ती मजीप्रामार्फत पुढील ६ महिने करण्याकरिता मान्यता देण्यात येत आहे. या अनुषंगाने बैठकीत चर्चा झाली असता सदर योजना जिल्हा परिषद/ग्रामपंचायत यांना हस्तांतरित करणे आवश्यक असल्याने योजना जिल्हापरिषदेमार्फत चालविण्याच्या अनुषंगाने शासन निर्णयातील सदर अट क्र.२ सुधारित करण्याबाबत मुख्य अभियंता यांनी सदस्य सचिव कार्यालयामार्फत प्रस्ताव शासन सादर करावा.

२. ज्या कालावधीमध्ये योजना मजीप्रामार्फत चालविली आहे त्या कालावधीतील खर्चाची वसुली जिल्हा परिषद/ ग्रामपंचायतीमार्फत करण्यात यावी व याकरिता पाणी दर मजीप्रामार्फत अंतिम करण्यात यावे. योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित झाल्यानंतर पाणी पट्टीच्या दराबाबत जिल्हा परिषदेमार्फत कार्यवाही करण्यात यावी.

३. हस्तांतरणापूर्वी ज्या कालावधीत योजना मजीप्रामार्फत चालविण्यात आलेली आहे व त्या कालावधीतील रक्कम संबंधित ग्रामपंचायत/ जिल्हापरिषदेकडून येणे बाकी असल्यास सदर रक्कम जिल्हा परिषदेच्या निधीतून कपात करून मजीप्रास उपलब्ध करून देण्याबाबत ग्रामविकास विभागास प्रस्ताव पाणी पुरवठा विभागामार्फत सादर करणे आवश्यक असून यासाठी आवश्यक तो प्रस्ताव मजीप्राने पाणी पुरवठा विभागास सादर करावा.

४. सदर योजना हस्तांतरित करताना जिल्हा परिषद/ ग्रामपंचायत यांना समक्षपणे हस्तांतरित करावी. योजना हस्तांतरित करताना अडचणी निर्माण झाल्यास योजना एकतर्फी हस्तांतरित करावी. याकरिता आवश्यक सर्व कागदपत्रे जिल्हा परिषद/ ग्रामपंचायत यांच्या ईमेल वर पाठविण्यात यावेत. तसेच पाणी पुरवठा सुरु असल्याबाबतचे व्हिडीओ शुटींग करून त्यांना पाठविण्यात यावेत.

५. वरील सर्व बाबी करताना इतर आवश्यक कार्यवाही करावयाची असल्यास सदस्य सचिव यांनी मा.अध्यक्षांच्या मान्यतेने सदर कार्यवाही करावी.

उपरोक्त ठरावानुसार पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.१३ :-** **राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ९५ गांवे ग्रीड पाणी पुरवठा योजना ता.मंठा जि. जालना** - योजनेची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करणे व देखभाल, दुरुस्तीकरिताचा खर्च म.जी.प्रा.च्या स्वनिधीतून करण्याच्या प्रस्तावास मा.संचालक मंडळाच्या मान्यतेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची मा.संचालक मंडळास अवगत केले.

**अ) प्रस्तावना :**

१. दि. १८.०६.२०१८ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे ९५ गांवे ग्रीड पाणी पुरवठा योजना ता. मंठा जि. जालना या योजनेच्या रु. ११७३९.०४ लक्ष किंमतीच्या योजनेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली होती. तद्नंतर १७६ ग्रीड योजनेतील व ९२ गावे ग्रीड या योजनेतील बऱ्याच गावांची पाईप लाईन एकमेकांना समांतर येत असल्यामुळे पाईप लाईनची पुनरावृती टाळण्यासाठी दोन्हीही योजना सुधारीत करण्यात आल्या.

२. सुधारीत योजनेमध्ये ९२ गावांच्या ग्रीड योजनेतील ५८ गावांचा समावेश १७६ गावांच्या ग्रीड योजनेत करण्यात आला व १७६ गावांच्या ग्रीड योजनेतील ६१ गावांचा समावेश ९२ गावांच्या ग्रीड योजनेत करण्यात आला. त्यामुळे १७६ गावांची ग्रीड योजना ही १७३ गावांची झालेली आहे व ९२ गावांची ग्रीड योजना ९५ गावांची झालेली आहे.

३. त्यानुसार सुधारित करण्यात आलेल्या ९५ गावांच्या ग्रीड पाणी पुरवठा योजनेच्या रु. १३२८२.०८ लक्ष किंमतीच्या सुधारीत अंदाजपत्रकास शासन निर्णय दि.२८/०६/२०१९ अन्वये सुधारित प्रशासकीय प्रदान करण्यात आली आहे.

४. सुधारीत योजनेच्या प्रशासकीय मान्यतेच्या शासन निर्णयातील अट क्र.२ अन्वये सदर योजनेचे कार्यान्वयन, संचलन व देखभाल-दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येईल असे नमुद असल्यामुळे सदर योजनेची देखभाल-दुरुस्ती व पाणीपट्टीची वसूली मजीप्रामार्फत करण्याविषयीचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**ब) योजनेची सद्यःस्थिती :**

१. योजनेची स्थापत्य कामाची अंतिम देयके दि.३१.१२.२०२३ रोजी अदा केली असून योजनेवर अंतिम देयाकापर्यंत रु.१००.२५ कोटी इतका खर्च झाला आहे. दि.०१.०२.२०२४ ते दि.०१.०८.२०२५ या कालावधीत योजनेची चाचणी, योजनेचे ठेकेदार मे. जयदीपराज कन्स्ट्रक्शन यांनी केली आहे. चाचणी कालावधी संपल्याने दि.०१.०८.२०२५ पासून योजना बंद आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

२. ९५ गावांची ग्रीड पाणीपुरवठा योजनेच्या जलशुद्धीकरण केंद्राची व शिर्षकामाची विद्युत जोडणी अनुक्रमे दि.३१.१२.२०२३ व दि.२६.०१.२०२४ रोजी प्राप्त झाली होती. त्यानंतर स्थापत्य कामाचे ठेकेदार मे.आर.ए. घुले व यांत्रिकी कामाचे ठेकेदार मे. सुवास इलेक्ट्रिकल्स, ठाणे यांनी चाचणी कालावधी सुरु केला होता.

३. सद्यस्थितीत सदर योजनेद्वारे समाविष्ट ९५ गावांपैकी ८९ गावापर्यंत पाणी पोहोचले आहे.

४. स्थापत्य कामाचे ठेकेदार मे. आर.ए. घुले यांनी योजनेची चाचणी दि.०१.०८.२०२५ पर्यंत सुरु होती. त्यानंतर योजनेचा चाचणी कालावधी संपल्यानंतर ठेकेदाराने देखभाल व दुरुस्तीचे काम बंद केले आहे.

५. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रस्ता रुंदीकरणाची व पुलाची कामे, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळामार्फत विद्युत खांबाच्या उभारणीच्या कामादरम्यान, तसेच शेतीच्या कामादरम्यान योजनेतील एअर व्हॉल्व्हच्या तुटफुटी व चोरीमुळे योजनेच्या चाचणी कालावधीस विलंब झाला आहे.

६. दि०९.०१.२०२४ रोजी संपन्न झालेल्या मा. संचालक मंडळाच्या बैठक क्र. १५५ मधील बाब क्र.१७ अन्वये सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षासाठी ९५ गावांची ग्रीड पाणी पुरवठा योजनेच्या देखभाल व दुरुस्तीसाठी रु.४३४.२८ लक्ष खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली होती. तथापि, योजनेकरिता आवश्यक विद्युत जोडणी प्राप्त होण्यास विलंब झाला. तसेच सदरचा खर्च करण्यासाठी संचालक मंडळाची मान्यता केवळ सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षासाठी असल्याने मार्च २०२५ नंतर सदर निधी वापरता आला नाही. त्यामुळे १५५ व्या बैठकीतील मंजूर प्रशासकीय मान्यतेनुसार निविदा प्रसिध्द करण्यात आली नाही व निधीचा वापर झाला नाही.

७. योजनेची डिसेंबर २०२५ पर्यंतची विद्युत देयकाची थकबाकी रु.६७.३९ लक्ष व जलसंपदा विभागाकडे जून २०२५ पर्यंतची भरावयाची पाणी देयकाची रक्कम रु.१०.९६ लक्ष अशी एकूण रु.७८.३५ लक्ष इतक्या रक्कमेचा खर्च, योजनेच्या चाचणी कालावधीत खचित पडला असल्याने सदरच्या खर्चाची मागणी शासनाकडून करणे आवश्यक आहे.

**क) योजनेच्या देखभाल-दुरुस्ती विषयक विश्लेषण :**

सदर योजना सन २०२४-२५ या कालावधीसाठी चालविण्याचा देखभाल दुरुस्तीच्या रु.४३४.२८ लक्ष इतक्या रक्कमेच्या खर्चास मजीप्राच्या संचालक मंडळाच्या १५५ व्या बैठकीत मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. देखभाल-दुरुस्ती खर्च व अपेक्षित पाणीपट्टी वसूलीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| सन | पाण्याची मागणी | देखभाल दुरुस्ती खर्च | पाणीपट्टी वसूली | दर प्रति १००० लि. |
|---|---|---|---|---|
| २०२५-२६ | ९.८१ दलली/दिन | रु.५९०.११ लक्ष | रु.६२४.८२ लक्ष | रु.१८.३१ |

**ड) प्रस्ताव व कार्यक्रम बाब सादर करण्याची आवश्यकता :**

सुधारीत योजनेच्या शासन निर्णयातील अट क्र.२ अन्वये सदर योजनेचे कार्यान्वयन, संचलन व देखभाल दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत करण्यात येईल असे नमुद असल्यामुळे सदर योजनेची देखभाल-दुरुस्ती व पाणीपट्टीची वसूली मजीप्रामार्फत करण्याविषयीचा प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**इ) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि.०९.०१.२०२४ रोजी झालेल्या १५५ व्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार तपशील :**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि ०९.०१.२०२४ रोजी झालेल्या १५५ व्या बैठकीच्या इतिवृतामधील बाब क्र. १७ अन्वये खालील अटींच्या अधीन राहून योजनेची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमार्फत करण्याच्या कार्यक्रम बाबीस मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

"राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ९५ गांवे ग्रीड पाणी पुरवटा योजना ता.मंठा, जि.जालना या योजनेची महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमार्फत देखभाल व दुरुस्ती करणे, योजनेतील समाविष्ट गावांना व इतर ग्राहकांना ठोक पाणी पुरवठा करणे व पाणीपट्टीची वसुली महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमार्फत करण्यात येईल."

या योजनेच्या बाबतीत नियमित पाणीपट्टी भरणे / वसूली करणे विषयी आवश्यक तो करारनामा मजीप्रा व जिल्हा परिषद / ग्रामपंचायत यामध्ये करुन घ्यावा.

**ई) सन २०२५-२६ या कालावधीकरिता सादर करण्यात आलेल्या अंदाजपत्रकाचा तपशील :**

मुख्य अभियंता यांनी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी योजनेची देखभाल, दुरुस्ती व योजना चालविण्याच्या कामाचे रु.५९०.११ लक्ष इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास अटी व शर्तीच्या अधिन राहून मुख्य अभियंता यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे व सदर अंदाजपत्रक मजीप्रा संचालक मंडळाच्या बैठकीच्या मान्यतेसाठी कार्यक्रम बाबीद्वारे सादर केले आहे.

उ) सदर योजने संदर्भात सन २०२५ च्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात मा. विधानसभा सदस्य, जालना, परतुर व मंठा विधानसभा मतदारसंघ श्री.बबनरावजी दतात्रय यादव (लोणीकर) यांनी नियम १०५ अन्वये लक्षवेधी सुचना क्र.१११५ द्वारे सदर योजनेची कामे अपूर्ण असणे, योजनेमध्ये समाविष्ट गावांना पाणी पोहचले नसणे इत्यादीबाबत लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. सदर लक्षवेधी सूचनेचे निवेदन सादर करताना ९५ गावे ग्रीड पध्दतीच्या पाणी पुरवठा योजनेत समाविष्ट सर्व गावांना त्वरीत पाणी पुरवठा सुरु करण्यात येईल असे आश्वासन मा. मंत्री महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता यांनी दिले आहे. त्यामुळे सदर योजनेमधुन पाणी पुरवठा सुरु करणे आवश्यक आहे.

९५ गावे ग्रीड पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती करण्याच्या रु.५९०.११ लक्ष इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास मा.मंत्री महोदय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सदर निधी मजीप्राच्या स्वनिधीतून उभारण्यास मा.संचालक मंडळाची मान्यता घेण्याच्या अटीवर प्रस्तावास मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त नमूद वस्तुस्थितीनुसार ९५ गावे ग्रीड पाणी पुरवठा योजना ता. मंठा, जि.जालना. योजनेची देखभाल व दुरुस्ती करण्याच्या रु.५९०.११ लक्ष इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत मा. संचालक मंडळास विनंती करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

ऊ) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना अंतर्गत ९५ गांवे ग्रीड पाणी पुरवठा योजनेच्या सन २०२५-२०२६ या उर्वरित कालावधीसह एक वर्षाच्या देखभाल व दुरुस्तीकरिता लागणाऱ्या रु.५९०.११ लक्ष खर्चाच्या अंदाजपत्रकास खालील अटींच्या अधिन राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे व सदरचा खर्च प्राधिकरणाच्या स्वनिधीतून करण्यास खालील अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

**अटी :**

१. सदर ठरावान्वये योजना चालविण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे. योजना चालविण्याचा खर्च व पाणीपट्टी वसूली यांचा वेळोवेळी आढावा घेऊन समतोल राखण्याची जबाबदारी क्षेत्रिय कार्यालयाची राहील.

२. सदर योजना चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणे, वसूली व खर्च याचा समतोल राखणे इत्यादी कामाकरिता नियमित इंजिनियर इनचार्ज (Engineer In Charge) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, जालना, हे राहतील व याबाबतची सर्वस्वी जबाबदारी इंजिनियर इनचार्ज म्हणून कार्यकारी अभियंता यांची राहील.

३. योजना चालविण्याचा व देखभाल दुरुस्तीचा खर्च मंजूर अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घ्यावी.

४. योजनेतील समाविष्ट गावांकडून व इतर ग्राहकांकडून पाणीपट्टीची वसूली करण्याची जबाबदारी क्षेत्रिय कार्यालयाची राहील. वसूलीबाबतचा नियमितपणे आढावा घेऊन वसूली व खर्च याचा समतोल राखणे व यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी मुख्य अभियंता यांची राहील.

५. योजनेत समाविष्ट गावांना ठोक पाणी पुरवठा करण्यात येईल व ३ महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी पाणी पुरवठयाच्या देयकाची रक्कम प्रलंबित राहीलेल्या ग्राम पंचायतीचा पाणी पुरवठा खंडित करण्यात येईल.

वरील प्रस्तावाबाबत मा.संचालक मंडळाच्या बैठकीत चर्चा होऊन पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

- **ठराव :-**

१. सदर योजनेस पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दि.२८.०६.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर शासन निर्णयामधील अट क्र.२ नुसार सदर योजनेचे संचलन व देखभाल दुरुस्ती मजीप्रामार्फत करावयाची आहे. याअनुषंगाने सदर योजनेची देखभाल व दुरुस्ती मजीप्रामार्फत पुढील ६ महिने करण्याकरिता मान्यता देण्यात येत आहे. या अनुषंगाने बैठकीत चर्चा झाली असता सदर योजना जिल्हा परिषद/ग्रामपंचायत यांना हस्तांतरित करणे आवश्यक असल्याने योजना जिल्हापरिषदेमार्फत चालविण्याच्या अनुषंगाने शासन निर्णयातील सदर अट क्र.२ सुधारित करण्याबाबत मुख्य अभियंता यांनी सदस्य सचिव कार्यालयामार्फत प्रस्ताव शासन

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

सादर करावा.

२. ज्या कालावधीमध्ये योजना मजीप्रामार्फत चालविली आहे त्या कालावधीतील खर्चाची वसुली जिल्हा परिषद/ ग्रामपंचायतीमार्फत करण्यात यावी व याकरिता पाणी दर मजीप्रामार्फत अंतिम करण्यात यावे. योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित झाल्यानंतर पाणी पट्टीच्या दराबाबत जिल्हा परिषदेमार्फत कार्यवाही करण्यात यावी.

३. हस्तांतरणापूर्वी ज्या कालावधीत योजना मजीप्रामार्फत चालविण्यात आलेली आहे व त्या कालावधीतील रक्कम संबंधित ग्रामपंचायत/ जिल्हापरिषदेकडून येणे बाकी असल्यास सदर रक्कम जिल्हा परिषदेच्या निधीतून कपात करून मजीप्रास उपलब्ध करून देण्याबाबत ग्रामविकास विभागास प्रस्ताव पाणी पुरवठा विभागामार्फत सादर करणे आवश्यक असून यासाठी आवश्यक तो प्रस्ताव मजीप्राने पाणी पुरवठा विभागास सादर करावा.

४. सदर योजना हस्तांतरित करताना जिल्हा परिषद/ ग्रामपंचायत यांना समक्षपणे हस्तांतरित करावी. योजना हस्तांतरित करताना अडचणी निर्माण झाल्यास योजना एकतर्फी हस्तांतरित करावी. याकरिता आवश्यक सर्व कागदपत्रे जिल्हा परिषद/ ग्रामपंचायत यांच्या ईमेल वर पाठविण्यात यावेत. तसेच पाणी पुरवठा सुरु असल्याबाबतचे व्हिडीओ शुटींग करून त्यांना पाठविण्यात यावेत.

५. वरील सर्व बाबी करताना इतर आवश्यक कार्यवाही करावयाची असल्यास सदस्य सचिव यांनी मा.अध्यक्षांच्या मान्यतेने सदर कार्यवाही करावी.

उपरोक्त ठरावानुसार पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१४ :-** मा.सर्वोच्च न्यायालयासमोरील न्यायालयीन प्रकरणांमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची बाजू मांडण्यासाठी तातडीची बाब म्हणून नियुक्त अधिवक्त्याबाबत कार्योत्तर मंजूरी तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मंडळावर अधिवक्त्याची नियुक्तीबाबतचे दि.१७.०७.२०१५ रोजीच्या विनियमात सुधारणा करणेसाठी प्रारुप शासनास सादर करणे.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये प्राधिकरणाशी संबंधित न्यायालयीन प्रकरणे उद्भवतात. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाशी संबंधित याचिकेतील प्रकरणासाठी पॅनेलवर वकीलाची नियुक्ती करण्यासाठीच्या विनियम महाराष्ट्र शासन, राजपत्र भाग चार (क) दि. १७ जुलै, २०१५ अन्वये राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले आहेत. सदर विनियम हे मा.उच्च न्यायालयामध्ये, तसेच दिवाणी, फौजदारी, कामगार व औद्योगिक न्यायालात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पॅनेलवर वकील नेमण्यासाठी आहे. त्यानुसार मा.उच्च न्यायालय, म.जी.प्रा.चे पॅनलवर अधिवक्ता नियुक्त करण्यात आलेले आहेत. तथापि, मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वतीने व विरुध्द प्रलंबित असलेले प्रकरणे हाताळण्यासाठी अधिवक्ता नेमणूक पॅनेल तयार करण्यात आलेले नाही.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

दरम्यानच्या काळात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची मा.सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडण्यासाठी अधिवक्ता नसल्याने त्यांची नियुक्ती करण्याची बाब विचाराधीन होती. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पॅनेलवरील अधिवक्तास प्रत्येक याचिकेसाठी द्यावयाची फी निश्चित करण्यात आली आहे. सदर व्यावसायिक फी मध्ये ती याचिका निकाली निघेपर्यंत होणाऱ्या सर्व सुनावण्या व शपथपत्राचा समावेश होतो. मा.सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून Panel Advocate नाहीत. मा.सर्वोच्च न्यायालयात (श्री.मनोज बैस) रिट याचिका क्र.३९६४/२०२४ मधील दि.११.१०.२०२४ रोजीच्या मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात SLP दाखल करावयाची होती. त्याचप्रमाणे SLP Diary No.३७२३७/२०२४ या प्रलंबित याचिकेमध्ये देखील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची बाजू मांडावयाची होती. त्यामुळे प्रशासकीय निकड विचारात घेता, ॲड शिवाजी जाधव यांना प्राधिकरणाचे दि. ०९.५.२०२५ रोजीच्या पत्रातील अटी व शर्तीनुसार मा.सर्वोच्च न्यायालयात प्रत्येक प्रकरण चालविण्याकरिता दि.०२.०४.२०२५ रोजीच्या पत्रानुसार दिलेली सहमती व एकत्रित मान्य केलेले मानधन रु.७५,०००/- + ५०००/- अशी एकूण रु.८०,०००/- व्यावसायिक फी देण्याबाबत सदस्य सचिव यांनी मान्यता दिली आहे.

सबब, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची बाजू मा.सर्वोच्च न्यायालयात मांडण्यासाठी प्राधिकरणाने दि.९.५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये नेमणूक करण्यात आलेले ॲड शिवाजी एम.जाधव यांच्या प्रस्तावास कार्योत्तर मंजूरीसाठी सदर प्रस्ताव मा.संचालक मंडळापुढे सादर करावयाची कार्यक्रम बाब तयार करण्यात आली आहे.

तसेच ॲड शिवाजी एम.जाधव यांची करण्यात आलेली नियुक्ती एक वेळची तातडीची बाब असल्याने त्यांच्याकडे आजपर्यंत सोपविण्यात आलेल्या मा.सर्वोच्च न्यायालयातील याचिकांपुरती सदर नियुक्ती सिमित राहिल.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि.१७.०७.२०१५ रोजीच्या विनियमात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये बाजू मांडण्यासाठी पॅनेल तयार करण्याबाबतची कार्यपद्धतीसाठी सुधारणा / तरतूद करणे आवश्यक आहे. तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे कोल्हापूर येथे नव्याने खंडपीठ सुरु झाले असल्याने या खंडपीठासाठी देखील वकिलांचे पॅनेल तयार करण्याबाबत तरतूद विनियमात करणे आवश्यक आहे. याअनुषंगाने विनियमात बदल करून सुधारणा करणे आवश्यक आहे. विनियमातील विनियम क्र.१४ नुसार विनियमामध्ये सुधारणा करण्याचा अधिकार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळाकडे विहित असून त्या सुधारणा शासनाच्या पूर्वमान्यतेनेच अंमलात येईल अशी तरतूद आहे.

उपरोक्त बाबी विचारात घेता सादर केलेल्या या कार्यक्रम बाबीवर मा.संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली व पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की,

अ) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची मा.सर्वोच्च न्यायालयासमोर दि.०९.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये ॲड.शिवाजी एम. जाधव यांच्या केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. दि.०९.०५.२०२५ रोजीच्या

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

पत्रात नमुद केल्यानुसार, त्यांना प्रत्येक प्रकरणी मानधन रु.७५,०००/- + ५,०००/- (एकूण रु.८०,०००/-) देण्यास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. ॲड. शिवाजी एम.जाधव यांची करण्यात आलेली नियुक्ती, एक वेळची तातडीची बाब असल्याने त्यांच्याकडे आजपर्यत सोपविण्यात आलेल्या मा.सर्वोच्च न्यायालयातील याचिकांपुरती सदर नियुक्ती सिमित राहिल.

ब) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये बाजू मांडण्यासाठी पॅनल तयार करण्याबाबतची कार्यपध्दतीसाठी दि.१७.०७.२०१५ रोजीच्या विनियमात सुधारणा/तरतूद करणे आवश्यक आहे. तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे कोल्हापूर येथे नव्याने खंडपीठ सुरु झाले असल्याने या खंडपीठासाठी देखील वकिलांचे पॅनल तयार करण्याबाबत तरतूद विनियमात करणे आवश्यक आहे. याअनुषंगाने विनियमात बदल करुन सुधारणा करणे आवश्यक आहे. विनियमातील विनियम क्र.१४ नुसार विनियमामध्ये सुधारणा करण्याचा अधिकार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळाकडे विहित असून त्या सुधारणा शासनाच्या पुर्वमान्यतेनेच अंमलात येईल, अशी तरतूद आहे. यास्तव, विनियमात योग्य ती सुधारणा करुन सदर प्रारुपास मा.मंत्री तथा अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची मान्यता घेऊन सदर प्रारुप शासनाच्या मान्यतेस्तव सादर करणेसाठी तसेच शासन मान्यतेनंतर विनियम विहित करुन पुढील कार्यवाहीसाठी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१५ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास प्राप्त आयकर विभागाच्या नोटीसांबाबत प्राधिकरणाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी विधीज्ञ यांची नियुक्ती करणेबाबत.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ना-नफा (No profit) संस्था म्हणून आयकर कायद्याच्या कलम १२अ अंतर्गत नोंदणी प्राप्त केली आहे. त्याअनुषंगाने, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुल्यांकन वर्ष २०१५-१६ चे NILL असे returns files केले आहे. तथापि, याप्रकरणी आयकर अधिनियम १९६१ चे कलम ११ अंतर्गत तरतूदीनुसार आयकराच्या रक्कमेतून सूट मागितलेली रक्कम रु.९२७,४५,३०,०७०/- चा खर्च हा आयकर विभागाने नाकारून, सदर रक्कम उत्पन्न (जमा) ग्राह्य धरून सदरच्या रक्कमेवर रु.४०८,५५,८४,८७०/- कराची/दंडाची मागणी विभागाकडून करण्यात आली आहे. त्याविरुद्ध तात्कालीन सनदी लेखापाल संस्थेकडून सदरचे सूट मिळावी म्हणून rectification अर्ज करण्यात आला. तथापि, २०१५-१६ मध्ये Schedule Audit Information form 10 B हा वेळेत सादर केला नसल्याचे कारण देत कलम ११ खालील सूट का नाकारण्यात येऊ नये याकरिता सुनावणीची नोटीस देण्यात आली.

आयकर अधिनियम १९६१ च्या कलम १२A(b) नुसार लेखापरीक्षण अहवाल (फॉर्म १० ब) सादर करण्यास ५९७ दिवसाचा विलंब झालेला असल्याने तसेच विलंबास समर्पक कारणे दिलेले नसल्याने आणि मजीप्राने सन २०१३-१४ ते २०२२-२३ कालावधीचे (फॉर्म १० ब) सादर करण्यास झालेला विलंब पाहता (फॉर्म १० ब) विलंबाने सादर करण्याची मजीप्राची सवय दिसते अशी कारणे नोंदवून मजीप्राचा सन २०१५-१६ मधील (फॉर्म

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

१० ब) सादर करण्यास झालेला विलंब क्षमापित करण्याची मागणी दि.०७/०८/२०२४ च्या आदेशान्वये आयकर आयुक्त (Exemption) यांनी खारीज केली आहे.

याप्रकरणी, सदर नोटीस हाताळण्यासाठी संदर्भीय आदेश क्र.१ व २ द्वारे मे.जैन लॉ पार्टनर एलएलपी या संस्थेची नेमणूक करण्यात आली. सदर संस्थेमार्फत, सादर आदेश विरुद्ध central Board of Direct Taxes (CBDT) यांच्याकडे याचिका दाखल करण्यात आली. तथापि (फॉर्म १० ब) सादर करण्यास झालेला विलंब क्षमापित करण्याची मागणी आयकर आयुक्त (Exemption) यांनी यापूर्वीच खारीज केली असल्याने CBDT यांना त्यावर अपील अथवा पुनर्विचारचे अधिकार नाहीत असे नमूद करून सदरची याचिका CBDT ने दाखल करून घेतली नाही. त्यामुळे सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, बॉम्बे येथे रिट याचिका दाखल करण्याकरिता जैन लॉ पार्टनर या फर्मने रिट याचिकेचा मसुदा दि.२५/११/२०२५ रोजी सदस्य सचिव यांच्याकडे सादर केला. दि.१५/१२/२०२५ रोजी सदस्य सचिव यांच्या उपस्थितीत या मसुद्याचे संपूर्ण वाचन करण्यात आले. सदर मसुद्यात मांडलेले मुद्दे परिपूर्ण नसल्याचे व याबाबत अधिक कार्यक्षम तसेच अश्या स्वरूपाच्या प्रकरणाचा अनुभव असलेल्या विधीतज्ञाकडून मार्गदर्शन घेण्याबाबत सदस्य सचिव यांनी निर्देशित केले.

**<u>जैन लॉ पार्टनर यांच्याकडून आजतागायत केलेल्या कार्यवाहीचा तपशील :-</u>**

दि.२५/११/२०२५ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आयकर विषयक विविध प्रकरणांबाबत तयार करण्यात आलेल्या Status of Proceedings/Pending Work Chart तसेच सध्या नियुक्त असलेल्या Jain Law Partners LLP यांनी सादर केलेल्या माहितीचा सखोल आढावा घेण्यात आला आहे. सदर आढाव्यातून खालील बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. मुल्यांकन वर्ष २०१५-१६ बाबत CBDT कडून विलंब माफी अर्ज नामंजूर झाल्यानंतर उच्च न्यायालयात दाखल करावयाच्या रिट याचिकेबाबत केवळ मसुदा तयार करण्यात आला असून, आज अखेर प्रत्यक्ष याचिका दाखल झालेली नाही.

२. मुल्यांकन वर्ष २०१६-१७ बाबत CIT (Appeals) समोर अतिरिक्त मुद्दे स्वीकारण्यासाठी अर्ज दाखल असला तरी प्रकरणात कोणतीही ठोस प्रगती झालेली नाही. आयकर विभागाशी प्रभावी पाठपुरावा झाल्याचे दिसून येत नाही.

३. मुल्यांकन वर्ष २०२२-२३ बाबत Rectification व Form १०B विलंब माफीचे अर्ज DCIT (Exemption) यांच्याकडे दीर्घकाळापासून प्रलंबित असून, संबंधित अधिकाऱ्यांकडे आवश्यक ती तीव्रता व सातत्याने पाठपुरावा झालेला नाही.

४. आयकर विभागाकडून मागणी नोटीस (u/s १५६) प्राप्त झालेली असून, योग्य वेळी व योग्य प्रकारे प्रतिसाद न दिल्यास आयकर अधिनियम, १९६१ अंतर्गत जबरदस्तीची वसुली (Recovery Proceedings) सुरू होण्याची गंभीर शक्यता निर्माण झाली आहे.

सध्या नियुक्त विधिज्ञांनी मांडलेली कायदेशीर भूमिका व केलेला पाठपुरावा एकूणच समाधानकारक नसून, त्यामुळे प्रकरणे अनावश्यकरित्या प्रलंबित राहिली आहेत व प्राधिकरणाच्या आर्थिक तसेच कायदेशीर हितास बाधा पोहोचण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता, आयकर विषयक

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

प्रकरणांचा त्वरित, प्रभावी व समाधानकारक निपटारा होण्यासाठी सध्याच्या विधिज्ञांऐवजी नवीन अनुभवी Advocate/Law Firm नियुक्त करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट होते.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाप्रमाणे आयकर विभागाच्या नोटीसा एमआयडीसी याही संस्थेला प्राप्त झालेल्या असून, याप्रकरणी आयकर विभागाकडून वसुलीसाठी टाळेबंदी पर्यंतच्या कठोर कारवाईस सामोरे जावे लागल्याचे समजते या अनुषंगे व मा.संचालक यांनी MIDC कार्यालयात प्रत्यक्ष भेट देवून वकील व त्याची कोर्ट केसबाबतची माहिती घेण्यासाठी आदेशीत केले. या प्राप्त माहिती नुसार मे.लक्ष्मीकुमारन श्रीधरन अॅटोर्नी यांनी MIDC ही शासनाची प्रतिनिधी संस्था आहे यांची सिद्धता न्यायालयात देत MIDC संस्थेला आयकर भरणेबाबत दिलासा दिला होता. त्याप्रमाणे महराष्ट्र जीवन प्राधिकरण सुद्धा शासन प्रतिनिधी म्हणून विनानफा काम करत असल्याने आपणास या कंपनीच्या उत्कृष्ट कामकाजाचे मार्गदर्शन मिळू शकते. मे. LKS And CO चे MIDC बाबतचे दर पत्रक सोबत जोडले आहे. तसेच कोल्हापूर महानगर पालिका ठराव, MSRTC व सिडको चे ठराव सोबत जोडले आहे.

१). महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ कलम १५(फ) नुसार प्राधिकरणाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी व कार्ये करण्यासाठी यातील तरतुदीनुसार प्राधिकरणाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी व कार्ये करण्यासाठी आवश्यक वाटेल त्याप्रमाणे कोणत्याही व्यक्तीशी किंवा व्यक्तींशी संविदा किंवा करार करण्याचे अधिकार प्राधिकरणाला आहेत. सदर तरतुदीनुसार, आयकर विभागाकडून मुल्यांकन वर्ष २०१५-२०१६ साठी प्राप्त नोटीस निकाली काढण्यासाठी, मे.जैन लॉ पार्टनर एलएलपी यांची नियुक्ती रद्द करून, मे.लक्ष्मीकुमारन श्रीधरन अटोर्नी यांची नियुक्ती करणेचा प्रस्ताव मान्यतेकरीता सोबत सादर करण्यात येत आहे तथापी मे.लक्ष्मीकुमारन श्रीधरन अटोर्नी यांचे प्रतिनिधी श्री.सम्यक यांच्याशी सदस्य सचिव, मजीप्रा, यांनी त्यांच्या दालनात दि.२६.०२.२०२६ रोजी मानधनाबाबत सविस्तर चर्चा केली असून, या दराची तुलना MIDC, MSRTC मुंबई महानगरपालिका, सिडको विभाग यांच्या दराची तुलना करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत या नुसार पुढील प्रमाणे ठराव करण्यात येत आहे. सदर बाबीवरील खर्च महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्वनिधीतून भागविण्यात येणार असल्याने सदर खर्चाच्या अंदाजपत्रकीय तरतुदीस तसेच खर्चाच्या महत्तम मर्यादा रक्कमेस मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. प्रकरणनिहाय तसेच आवश्यकतेनुसार व प्राधिकृत अधिकारी यांच्या मंजुरीनंतर या बाबीवर शासनाच्या विहित नियम तसेच निकषांनुसार खर्च नोंदविण्यात येत आहे.

**ठराव :-**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ कलम 15(फ) नुसार प्राधिकरणाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी व कार्ये करण्यासाठी प्राधिकरणास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे कोणत्याही व्यक्तीशी किंवा व्यक्तींशी संविदा किवा करार करण्याचा अधिकार आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास आयकर विभागाकडून आयकर विभागाकडून मुल्यांकन वर्ष २०१५-२०१६ करीता आयकर विभागाची रक्कम रु.४,०८,५५,८४,८७४/- ची नोटीस प्राप्त आहे. तसेच सद्यस्थितीत दि.११/१२/२०२५ रोजी आयकर विभागाकडून प्राप्त नोटीस नुसार एकत्रित रक्कम रु १६,८५,६९,३१,०७०/- इतकी आयकर मागणी आहे. सदर सर्व नोटीसा निकाली काढणे आवश्यक आहे. या करीता मे.लक्ष्मीकुमारन व श्रीधरन अटोर्नी यांची नियुक्ती कार्यक्रम बाबीत नमुद केलेल्या

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

दरपत्रकानुसार महत्तम मानधन घटक निहाय सदस्य सचिव यांची मान्यता घेवून रक्कम अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१६ :-** दि.१७ जुलै, २०२५ च्या शासन निर्णयान्वये अनुकंपा नियुक्तीचे सर्वसमावेशक सुधारीत धोरण तसेच त्याअनुषंगाने शासनाने निर्गमित केलेले शासन निर्णय/परिपत्रके लागू करणेबाबत शासनास सादर केलेल्या प्रस्तावास कार्योत्तर मंजूरीबाबत.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.अकंपा-१२२५/प्र.क्र.१२१/म.लो.आ., दिनांक १७ जुलै, २०२५ अन्वये या शासन निर्णयात नमुद असलेले सर्व शासन आदेश अधिक्रमित करुन अनुकंपा नियुक्तीचे सर्वसमावेशक सुधारित धोरण या शासन निर्णयाव्दारे निश्चित करण्यात आले आहे.

२. दिनांक १७ जुलै, २०२५ च्या शासन निर्णयामधील परिच्छेद (IX) (४) मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

सदर शासन निर्णय हा शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना लागू असून, निमशासकीय कार्यालये/स्थानिक स्वराज्य संस्था/शासनाच्या अधिपत्याखालील महामंडळे अथवा प्राधिकरण यामधील अधिकारी व कर्मचाऱ्यांना थेट लागू होत नाही. त्यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी अनुकंपा योजना लागू करण्याबाबत संबंधित प्रशासकीय विभागाने त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे निर्णय घेणे आवश्यक राहील.

त्यामुळे हा शासन निर्णय महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील अधिकारी व कर्मचाऱ्यांना थेट लागू होत नाही.

३. विषयांकित प्रकरणी सादर करण्यात येते की, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.बीजीटी-१०००/ प्र.क्र.१३/२०००/अर्थसंकल्प-१९, दिनांक १ मार्च, २००० अन्वये शासनाने सेवानिवृत्ती/स्वेच्छा सेवानिवृत्ती/ राजीनामा/मृत्यूमुळे रिक्त होणारी पदे भरण्यावर बंदी घालण्यात आली होती. याच धरतीवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सुध्दा दिनांक ८ मार्च, २००० अन्वये सेवानिवृत्ती/स्वेच्छा सेवानिवृत्ती/ राजीनामा/मृत्यूमुळे रिक्त होणारी पदे भरण्यावर बंदी घालण्यात आली होती.

४. तद्नंतर वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०१२/प्र.क्र.१५/१२/वित्तीय सुधारणा-१, दिनांक २२ मार्च, २०१२ अन्वये अनुकंपा तत्वावरील नियुक्तीच्या पदभरतीवरील निर्बंध शिथिल करुन शासन स्तरावरील अनुकंपाधारकांना नियुक्त्या देण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली. याच धर्तीवर दिनांक २३/८/२०१६ रोजीच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १३७ व्या बैठकीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवेत असतांना मृत्यु झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नेमणूक देण्याबाबत कार्यक्रम बाब क्र.१२ ठेवण्यात आली होती. दिनांक २२ मार्च, २०१२ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील लिपीक-टंकलेखक पद भरतीवरील निर्बंध शिथिल करुन गट-क मधील लिपीक-टंकलेखकांच्या एकूण रिक्त पदांच्या १०% पदांवर अनुकंपा तत्वावर नियुक्ती करण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली होती. या मान्यतेनुसार मध्यवर्ती कार्यालयीन दिनांक ९/११/२०१६ च्या पत्रान्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील लिपीक-टंकलेखक पदांवर अनुकंपा तत्वावर नेमणूक देण्याबाबत सर्व परिमंडळांना परवानगी देण्यात आली होती.

अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा.

५. तसेच राजेंद्र सुखानंद पाटणी, मा.विधासभा सदस्य यांचे सामान्य प्रशासन विभागाकडून प्राप्त झालेले दिनांक १७/१/२०१८ च्या पत्राच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २३/४/२००८ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अनुकंपा धारकांची भरती करण्याबाबत विनंती केली होती. या प्रकरणी सद्यस्थितीसह अहवाल शासनास सादर करणेबाबत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून दिनांक १२/२/२०१८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

६. मध्यवर्ती कार्यालयीन दिनांक २०/६/२०१८ च्या पत्रान्वये प्राधिकरणाचा आकृतीबंध अंतिम झाला नसल्यामुळे गट-क मधील कनिष्ठ लिपीक-टंकलेखक, वरिष्ठ लिपीक तसेच गट-ड मधील शिपाई व चौकीदार या संवर्गातील आकृतीबंधात प्रस्तावित करण्यात आलेली पदसंख्या विचारात घेऊन रिक्त असलेल्या पदांच्या ५०% पदांवर दिनांक २३/४/२००८ च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार ३ वर्षात (सन २०१८-१९ ते २०२०-२१) ५०% व २५% या प्रमाणात पात्र उमेदवारांना नियुक्ती देणेबाबतचा प्रस्ताव पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास सादर करण्यात आला होता.

७. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने दिनांक ४/१०/२०१८ च्या पत्रान्वये सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १५/२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय संख्येप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास ३ वरिष्ठ लिपीक, ७ लिपीक व ५ शिपाई याप्रमाणे एकूण १५ पदांवर अनुकंपा नियुक्तीने पदे भरण्यास सहमती देण्यात आली होती. त्यानुसार मध्यवर्ती कार्यालयीन दिनांक ८/१०/२०१८ च्या पत्रान्वये वर नमुद केलेल्या एकूण १५ पदांवर अनुकंपा नियुक्ती देण्याबाबत सर्व परिमंडळांना कळविण्यात आले होते.

८. मध्यवर्ती कार्यालयीन दिनांक ६/६/२०१९ व ७/८/२०१९ च्या पत्रान्वये दिनांक १५/२/२०१८ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार गट-क व ड मध्ये नमुद संवर्गातील एक वर्षात भरण्यास मान्यता असलेल्या रिक्त पदांच्या २०% पदे पात्र अनुकंपाधारकांमधुन भरती करण्यास मान्यता देण्याबाबत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास विनंती केली होती. त्यानुसार पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने दिनांक ११/१०/२०१९ च्या पत्रान्वये सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १०/६/२०१९ नुसार सरळसेवेने भरावयाच्या ज्या पदांच्या भरतीस वित्त विभागाचे कोणतेही निर्बंध नाहीत, अशी पदे सरळसेवेने भरताना प्रतिवर्षी रिक्त पदांच्या १०% पदे ही अनुकंपा नियुक्तीने भरण्यास परवानगी दिली होती.

९. वरील परिच्छेद क्र.८ मधील बाब विचारात घेऊन दिनांक २६/१०/१९९४ च्या शासन निर्णयानुसार व वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये कार्यरत असताना दिवंगत झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील एका सदस्यास प्राधिकरणाच्या सेवेत सन २०२३ अखेर नियुक्त्या देण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

१०. शासनाने दिनांक १७/०७/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये अनुकंपा नियुक्तीसाठी सर्वसमावेशक धोरण निश्चित केले असून सदर धोरण महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास थेट लागू होत नाही. सदर शासन निर्णय प्राधिकरणासाठी लागू करणेबाबत शासनास सविस्तर प्रस्ताव सादर करणे आवश्यक होते.

११. दिनांक १७ जुलै, २०२५ च्या शासन निर्णयान्वये अनुकंपा नियुक्तीचे सर्वसमावेशक निश्चित केलेले सुधारित धोरण व त्या अनुषंगाने शासनाने निर्गमित केलेले शासन निर्णय/परिपत्रके महाराष्ट्र जीवन

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबतची बाब विचारधीन आहे. त्याबाबतच्या प्रस्तावास मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे मान्यतेने दिनांक २३/२/२०२६ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास मान्यतेकरीता सादर केलेला आहे. उक्त प्रस्ताव संचालक मंडळांचे कार्योत्तर मान्यतेकरीता सादर करण्याचे प्रस्तावित आहे.

या कार्यक्रम बाबीवर मा.संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली व पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :-**

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.अकंपा-१२२५/प्र.क्र.१२१/म.लो.आ., दि.१७ जुलै, २०२५ अन्वये, राज्य शासकीय सेवेत कार्यरत असताना दिवंगत झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील एका सदस्यास अनुकंपा तत्वावर सेवेत नियुक्ती देण्यात येते. सदर शासन निर्णय व त्याअनुषंगाने वेळोवळी सुधारीत करण्यात येणारे शासन निर्णय/परिपत्रके महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये कार्यरत दिवंगत झालेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या कुटुंबियांना लागू करण्याबाबतच्या प्रस्तावास मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या मान्यतेने दि.२३.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या मान्यतेकरीता सादर केला आहे. यास मा.संचालक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. तसेच त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास्तव सदस्य सचिवांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

## आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.१:

**विषय :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, जळगाव येथील कार्यालयीन ईमारत व अधिकारी निवासस्थाने (Staff Quarters) यांचे दुरुस्ती व नुतनीकरणाबाबत प्रस्तावाची कार्यक्रम बाब मध्ये समावेश करणे.

मजीप्राची जळगाव येथील कार्यालयीन ईमारत व अधिकारी निवासस्थाने ही मजीप्राच्या मालकीची असून अत्यंत मोक्याच्या जागी आहे. सदर निवासस्थाने सन १९७९-१९८० साली तसेच कार्यालयीन ईमारत सन १९८८-१९८९ मध्ये बांधण्यात आली असून त्याला सुमारे ३५ ते ४५ वर्षे इतका कालावधी झाला आहे. सदर निवासस्थाने ओस पडलेली असल्याने मोठ्या प्रमाणात झाडे झुडपे उगवली आहेत. त्यामुळे निवासस्थानांपर्यंत जाणे अडचणीचे झाले आहे. तसेच निवासस्थानातील दरवाजे, खिडक्या इ. ची नासधूस झाली आहे, फ्लोरींग खचलेली आहे, इलेक्ट्रिक वायरिंग, प्लंबिंग व ड्रेनेज नादुरुस्त झाल्याने निवासस्थाने राहण्यायोग्य नाहीत. कार्यालयीन ईमारतीची पाठीमागील भिंत ओलांडून लगतचे रहिवाशी अतिक्रमणाचा प्रयत्न करीत असतात. चौकीदार उपलब्ध नसल्याने कार्यालयीन ईमारतीच्या आसपास अतिक्रमण झाल्याने कार्यालयीन कामकाजात अडथळे येत आहेत.

तसेच जिल्हाधिकारी, जळगाव यांनी सदर निवासस्थाने महसूल विभागास हस्तांतरित करण्याकरिता तगादा लावला आहे. सदर निवासस्थाने महसूल विभागाला हस्तांतरित केल्यास मजीप्राची मालकी संपुष्टात येणार आहे. सदर निवासस्थानांकरिता मजीप्रा अधिकारी / कर्मचारी यांची मागणी असल्याने त्यांना रहिवासासाठी सदर निवासस्थाने दुरुस्त करून उपलब्ध करून देणे उचित होईल. तथापि, निधीअभावी अद्यापपर्यंत दुरुस्ती व नुतनीकरण करणे शक्य झाले नाही.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

प्राप्त प्रस्तावानुसार, मजीप्रा विभाग, जळगाव कार्यालयातील तळमजला व पहिल्या मजल्याचे दुरुस्ती व नुतनीकरण करणे व जळगाव शहरातील मजीप्राच्या मालकीच्या निवासस्थान क्र.६बी, ७बी, ९बी/१ व ९बी/२ या निवासस्थानांचे दुरुस्ती व नूतनीकरण करणे या कामाचा समावेश आहे. त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | Particulars of work | Cost in Rupees |
|---|---|---|
| 1 | Repairs and Renovation to Government Quarters of MJP Bunglow No. 6B in Jalgaon City | 40,69,780/- |
| 2 | Repairs and Renovation to Government Quarters of MJP Bunglow No. 7B in Jalgaon City | 45,15,003/- |
| 3 | Repairs and Renovation to Government Quarters of MJP Bunglow No. 9B/1 in Jalgaon City | 31,32,790/- |
| 4 | Repairs and Renovation to Government Quarters of MJP Bunglow No. 9B/2 in Jalgaon City | 27,30,587/- |
| 5 | Repairs and Renovation to Government Administrative Building of MJP (Ground Floor) | 40,30,629/- |
| 6 | Repairs and Renovation to Government Administrative Building of MJP (First Floor) | 40,39,282/- |
| | **Total Amount** | **2,25,18,071/-** |
| | **Say Rs.** | **225.18 Lakhs** |

उपरोक्तप्रमाणे कार्यकारी अभियंता, मजीप्रा विभाग, जळगाव यांनी सदर अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता प्रदान केली असून त्यास मा.संचालक मंडळाच्या परवानगीने निधी उपलब्ध झाल्यानंतर मजीप्राच्या प्रचलित पद्धतीनुसार ई-निविदेद्वारे सदर काम करून घेण्याचे प्रस्तावित आहे.

सदर प्रकरणी उपरोक्तप्रमाणे चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव:-**

असा ठराव करण्यात येतो की, मुख्य अभियंता, नाशिक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, जळगाव येथील कार्यालयीन ईमारत व अधिकारी निवासस्थाने (Staff Quarters) यांचे दुरुस्ती व नुतनीकरणासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) सदर बांधकाम खूपच जुने झाले असल्याने बांधकामाची वापरण्यायोग्य गुणवत्ता कमी झाली असण्याची शक्यता आहे, तसेच जळगांव उपविभाग/विभाग/मंडळ या कार्यालयातील मंजूर पदे, भरलेली पदे, (संभाव्य भरती पदे) विचारात घेऊन पुर्नविकास/पुनर्बांधणीचा प्रस्ताव अधीक्षक अभियंता यांनी सदस्य सचिव यांना तात्काळ सादर करावे.

२) उपरोक्तप्रमाणे कार्यवाही केल्यानंतर सदर Architect/ Structural Consultant मार्फत प्राप्त निरीक्षणांच्या अनुषंगाने अस्तित्वातील बांधकाम पाडणे व त्याठिकाणी अद्ययावत व आधुनिक सोयींनी सुसज्ज असे अधिकारी व कर्मचारी निवासस्थाने तसेच कार्यालयीन इमारत बांधकाम करणे या कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन त्यास मंजूरी घेण्याच्या दृष्टीने मजीप्राच्या मा.संचालक मंडळास सादर करावेत.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

३) अशाचप्रकारे, म.जी.प्रा.च्या इतर ठिकाणी असलेल्या मालमत्तेचा संरक्षण व म.जी.प्रा.च्या हिताच्या दृष्टीने योग्य विकास करण्याबाबत अभ्यासपूर्वक प्रस्ताव सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास सादर करावा.

४) सदर कामाकरीता मजीप्रामार्फत आवश्यकता भासल्यास Architect/Structural Consultant ची नेमणूक सदस्य सचिव यांनी करावी व यासाठी आवश्यक शुल्क म.जी.प्रा.च्या निधी मधून करावे.

वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यास मा.संचालक मंडळ मान्यता देत आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.